परळी
# संघर्षनेता
समता, बंधुता, न्याय, अधिकारांचा नेता..
https://www.parlisangharshneta.in 9881265102 संपादक - मोहन व्हावळे
बीड | वर्षे- 11 वे | अंक क्र 57 | मंगळवार दि.10 मार्च 2026 | पृष्ठे 4 किंमत 2 ₹ | RNI: MAHMAR/2016/67060




# वित्तीय तूट, कर्ज, व्याज सारेच वाढले

## लाडकी बहिण, शेतकऱ्यांना मोफत वीज अशा काही सवंग लोकप्रिय घोषणांच्या अंमलबजावणीमुळे गेल्या काही वर्षांच्या तुलनेत यंदा महसुली तसेच राजकोषीय तूट




मुंबई : लाडकी बहिण, शेतकऱ्यांना मोफत वीज अशा काही सवंग लोकप्रिय घोषणांच्या अंमलबजावणीमुळे गेल्या काही वर्षांच्या तुलनेत यंदा महसुली तसेच राजकोषीय तूट मोठ्या प्रमाणावर वाढली आहे. स्थूल राज्य उत्पन्नाच्या तुलनेत राजकोषीय तूट ही तीन टक्क्यांपर्यंत असावी, अशी तरतूद असताना यंदाच्या आर्थिक वर्षात ही तूट 2.97 टक्क्यांपर्यंत गेली आहे. याबरोबरच कर्जाचा बोजा 11 लाख कोटींपेक्षा अधिक होणार असताना, कर्जावरील व्याज फेडण्यासाठीही सर्वात अधिक रक्कम खर्च होणार आहे.

अर्थसंकल्पात पुढील आर्थिक वर्षात 2026-27 मध्ये महसुली तूट ही 40,552 कोटी रुपयांची अपेक्षित धरण्यात आली आहे. त्याच वेळी वित्तीय तूट ही दीड लाख कोटींपेक्षा अधिक असेल, असा अंदाज आहे. चालू आर्थिक वर्षाच्या 2025-26 सुधारित अर्थसंकल्पात महसुली तूट ही मूळ अर्थसंकल्पातील 45 हजार कोटींवरून कमी होऊन 37 हजार कोटी होईल, असा अंदाज मांडण्यात आला आहे.

त्याच वेळी राजकोषीय म्हणजेच वित्तीय तूट ही 1 लाख 51 हजार कोटींपर्यंत वाढण्याची चिन्हे आहेत. गेल्या दहा वर्षांत सर्वाधिक महसुली तूट आणि वित्तीय तूट ही यंदाच्या आर्थिक वर्षात (2025-26) अनुभवास आली.राजकोषीय तूट ही यंदाच्या आर्थिक वर्षात 2.97 टक्के होण्याचा अंदाज आहे. पुढील वर्षी ही तूट 2.78 टक्क्यांपर्यंत कमी करण्याचा प्रयत्न आहे. राज्यावरील कर्जाचा बोजा हा 11 लाख कोटींवर जाार आहे. . कर्जावरील व्याज फेडण्यासाठी 2024-25 मध्ये 53 हजार कोटी खर्च झाले तर यंदा ही रक्कम 62 हजार कोटी आहे. पुढील आर्थिक वर्षात आतापर्यंतची सर्वाधिक 70 हजार कोटींची रक्कम खर्च होणार आहे.महसुली तूट आणि राजकोषीय तूट ही निकषांपेक्षा कमी असल्याचे मुख्यमंत्री तथा अर्थमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केले. पण लोकप्रिय घोषणांमुळे राज्याच्या तिजोरीवर बोजा वाढत चालला आहे. पुढील आर्थिक वर्षासाठी पहिल्या नऊ महिन्यांकरिता मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेकरिता 27 हजार कोटींची तरतूद करण्यात आली आहे. त्यातील 21 हजार हे महिला व बालविकास विभागातून दिले जातील. उर्वरित सहा हजार कोटी हे अनुसूचित जाती व जमातीच्या तरतुदीतून वळते केले जाणार आहेत. साडेसात अश्वशक्तीपर्यंतच्या कृषीपंपांसाठी मोफत वीज देण्याच्या निर्णयाने यंदा 32 हजार कोटी रुपयांचा बोजा सरकारच्या तिजोरीवर आला. पुढील वर्षासाठी 20 हजार कोटींची तरतूद अर्थसंकल्पात करण्यात आली आहे.शेतकऱ्यांचे सप्टेंबर 2025 पर्यंतचे दोन लाख रुपयांपर्यंतचे कर्जमाफ केले जाईल, अशी घोषणा मुख्यमंत्री फडणवीस पान 3 वर

# मराठवाड्यासाठी मोठी बातमी : नांदेड-लातूर प्रवास होणार अवघ्या सव्वा तासात

## अशोक चव्हाणांनी लावला जोर



नांदेड-लातूर थेट रेल्वे मार्गामुळे राज्याच्या विकासाला गती मिळेल, असा दावा करत खासदार अशोक चव्हाण यांनी या 104 किलोमीटरच्या नव्या रेल्वे मार्गाला केंद्राने तातडीने मान्यता द्यावी, अशी मागणी केली. मराठवाड्यातील नांदेड आणि लातूर या दोन कृषी व व्यापाराचे मोठे केंद्र असलेल्या शहरांना थेट रेल्वे मार्ग नाही, याकडेही त्यांनी लक्ष वेधले. नांदेड-लातूर थेट रेल्वे मार्गाचा प्रस्ताव केवळ दोन जिल्ह्यांना जोडणारा प्रकल्प नसून, ही विदर्भ, मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्र या तिन्ही विभागांना रेल्वे मार्गे जवळच्या अंतराने जोडणारी एक महत्त्वाची 'मिसिंग लिंक' असल्याने या प्रकल्पाला केंद्र सरकारने मंजूरी द्यावी, अशी मागणी अशोक चव्हाण यांनी राज्यसभेत केली.शून्य प्रहराच्या काळात हा मुद्दा उपस्थित करताना अशोक चव्हाण यांनी नांदेड आणि लातूर ही मराठवाड्यातील कृषी व व्यापाराची मोठी केंद्रे आहेत. मात्र, या दोन शहरांत अद्याप थेट रेल्वे मार्ग नाही. सध्या रेल्वेने 212 किमीचा वळसा घालून जाण्यासाठी 6 तास लागतात, तर रस्ते मार्ग 144 किमीचा आहे. प्रस्तावित 104 किमीच्या नवीन थेट रेल्वे मार्गामुळे हा प्रवास अवघ्या सव्वा तासात पूर्ण होणे शक्य असल्याचे सभागृहात सांगितले. ही मिसिंग लिंक पूर्ण झाल्यास विदर्भातील पान 3 वर

# आज ठळक

## महाराष्ट्र जमीन महसूल सुधारणा विधेयक विधानसभेत एकमताने मंजूर



राज्याचं अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरु आहे. आज महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (सुधारणा ) विधेयक मांडलं, हे विधेयक विधानसभेत एकमताने मंजूर करण्यात आलं आहे. हे विधेयक मंजूर झाल्यानं आता राज्यातील जी हजारो हेक्टर गायरान जमीन आहे, ती सार्वजनिक कामांसाठी उपयोगात आणण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. पूर्वी गायरान जमिनीचा उपयोग सार्वजनिक कामांसाठी करण्यात येत नव्हता, मात्र आता हे विधेयक मंजूर झाल्यामुळे राज्यातील हजारो हेक्टर गायरान जमीन सार्वजनिक कामांसाठी वापरण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी हे विधेयक मांडलं, हे विधेयक विधानसभेत एकमताने मंजूर करण्यात आलं आहे. हे विधेयक मंजूर झाल्यामुळे आता महापालिका तसेच नगरपालिका हद्दींमधील गायरान जमिनींच्या वापरासंदर्भातील नियमांमध्ये मोठे बदल झाले आहेत. आता ही महापालिका तसेच नगरपालिका हद्दींमधील हजारो हेक्टर गायरान जमीन सार्वजनिक तसेच जनहिताच्या कामांसाठी वापरण्याचा मार्ग मोकळा पान 3 वर

# शिंदेंना फोन करण्याचा ठाकरेंना सल्ला; महायुतीतील आणखी एक मंत्री अडचणीत?



उद्धव ठाकरे यांना विधान परिषदेवर जायचे असल्यास त्यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना फोन करावा, असा खोचक सल्ला खासदार नरेश म्हस्के यांनी दिला... मंत्री संजय शिरसाट यांच्या सामाजिक न्याय विभागात कोट्यवधींचा घोटाळा झाल्याचा आरोप करीत मनसे नेते संदीप देशपांडे यांनी मुख्यमंत्री फडणवीसांकडे चौकशीची मागणी केली... महापालिकेच्या स्वीकृत सदस्यांच्या निवडीवरून अकोल्यात काँग्रेसमध्ये नाराजीचा स्फोट झाला असून महानगर उपाध्यक्षांसह अनेक पदाधिकाऱ्यांनी सामूहिक राजीनामे दिले... आमदार रोहित पवार यांनी आपली राजकीय पोळी भाजण्यासाठी अजित पवार यांच्या विमान अपघाताबाबत चुकीची विधाने करू नये, असा सल्ला मंत्री गिरीश महाजन यांनी दिला... राज्य सरकारच्या कृषी वाहिनी योजनेत 10 हजार कोटी रुपयांचा महाघोटाळा झाल्याचा खळबळजनक आरोप ठाकरे पान 3 वर

# महिला आयोगाच्या निधीवरून मुनगंटीवार-मेघना बोर्डीकरामध्ये जुगलबंदी



राज्य विधिमंडळाचे अर्थसंकल्पीय अधिवेशन सध्या सुरु आहे. या अधिवशेनात विरोधकापेक्षा सत्ताधारी आमदार व माजी मंत्री सुधीर मुनगंटीवार पुन्हा एकदा आक्रमक झाले आहेत. गेल्याच आठवड्यात मुनगंटीवार व आशिष शेलार यांच्यात रंगलेली जुगलबंदी ताजी असतानाच सोमवारी पुन्हा एकदा राज्यातील महिला आयोगाच्या निधीवरून मुनगंटीवार-मेघना बोर्डीकरामध्ये जुगलबंदी रंगल्याचे पाहवयास मिळाले. यावेळी मुनगंटीवार यांनी गेल्या आठ महिन्यापासून फाइल पेंडिंग पडल्याचा आरोप करीत राज्य सरकारला घेरले. त्यामुळे वातावरण चांगलेच तापले होते.विधानसभेत सोमवारी भाजप (BJP) नेते सुधीर मुनगंटीवार आणि राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांच्यात राज्य महिला आयोगाच्या निधीवरुन जुगलबंदी पाहायला मिळाली. मुनगंटीवार यांनी मंजूर निधी आणि प्रत्यक्षात खर्च न झाल्याचा मुद्दा उपस्थित पान 3 वर

# भाजपचे मंत्री, आमदार रवींद्र चव्हाणांच्या रडारवर

- सभागृहातील बेशिस्तपणावर घेणार विभागनिहाय 'क्लास'



राज्य विधिमंडळाचे अर्थसंकल्पीय अधिवेशन गेल्या आठ दिवसापासून सुरु आहे. गेल्याच आठवड्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अर्थसंकल्प मांडला. त्यामध्ये शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्याची घोषणा करण्यात आली. त्यामुळे शेतकरी वर्गात आनंदाचे वातावरण पसरले आहे. तर दुसरीकडे कर्जमाफीची घोषणा करण्यात आल्याने विरोधकांकडे आता विरोधासाठी प्रभावी अस्त्र राहिले नाही. दुसरीकडे मात्र सभागृह सुरु असताना भाजपच्या मंत्री, आमदारांनी दांडी मारल्याने प्रदेशाध्यक्ष चव्हाण नाराजी व्यक्त केली आहे. येत्या काळात सभागृहातील नेतेमंडळीला शिस्त लावण्यासाठी आता रवींद्र चव्हाण हे मंत्री व आमदारांचा वर्ग घेणार असल्याचे समजते.भाजपचे (BJP) आमदार आणि मंत्री हेच दांडी मारत आहेत. त्यामुळे अधिवेशन काळात राज्यातील आमदारांना पान 3 वर


# वीज कामगार कॉंग्रेस इंटकचे मुख्य महासचिव दत्तात्रय गुट्टे यांना 'विद्यावाचस्पती (मानद डॉक्टरेट)' जाहीर

## कामगार चळवळ व सामाजिक कार्यासाठी दत्तात्रय गुट्टे यांना मानद डॉक्टरेट जाहीर ;१७ एप्रिल २०२६ रोजी प्रधानमंत्री संग्रहालय, नवी दिल्ली येथे पदवीदान समारंभ



परळी वैजनाथ (प्रतिनिधी) :- कामगार चळवळीतील ज्येष्ठ सहकारी, अभ्यासू आणि लढाऊ कामगार नेते तसेच महाराष्ट्र राज्य वीज कामगार काँग्रेस इंटकचे मुख्यमहासचिव दत्तात्रय दादाराव गुट्टे यांना त्यांच्या दीर्घकालीन सामाजिक कार्याची व कामगार चळवळीत दिलेल्या मोलाच्या योगदानाची दखल घेऊन विश्व संस्कृती एवं पर्यावरण संरक्षण आयोग, नवी दिल्ली या संस्थेकडून 'विद्यावाचस्पती (मानद डॉक्टरेट)' ही प्रतिष्ठेची पदवी जाहीर करण्यात आली आहे. 1994 साली एक सामान्य वीज कर्मचारी म्हणून सेवा सुरु करणाऱ्या दत्तात्रय गुट्टेंनी केवळ तीन दशके अथक परिश्रम, सातत्यपूर्ण संघर्ष आणि संघटनात्मक बांधिलकी यांच्या बळावर वीज कर्मचारी संघटनेच्या सर्वोच्च पदापर्यंत झेप घेतली. हे पद केवळ अधिकाराचं नव्हे, तर ते हजारो कर्मचाऱ्यांच्या आशा, आकांक्षा आणि जीवनाच्या आधाराचं प्रतिनिधित्व करणारं स्थान आहे. पान 3 वर

# राज्य सरकारला दणका! RTE कायद्यातील त्या तरतुदीवर कोर्टाचा सर्वात मोठा निर्णय



आरटीई कायद्याअंतर्गत खासगी विनाअनुदानित शाळांमध्ये वंचित आणि दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो. त्यासाठी 25 टक्के जागा राखीव ठेवल्या जातात. याच कायद्याबाबत आता मोठी अपडेट समोर आली आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने राज्य सरकारच्या आरटीई प्रवेशाच्या एक किमीचा अंतराचा निर्णय न्यायालयाने स्थगित केला आहे. याआधी सरकारच्या नव्या पान 3 वर

# एजाजोद्दिन इनामदार यांचे निधन

## राष्ट्रवादीचे मजाज इनामदार यांना बंधूशोक



परळी वैजनाथ (प्रतिनिधी) – येथील इस्लामपुरा, बंगला भागातील रहिवासी एजाजोद्दिन सरफराजोद्दिन इनामदार यांचे गुरुवार, दि. 6 मार्च रोजी दुपारी सुमारे अडीच वाजण्याच्या सुमारास अंबाजोगाई येथील शासकीय रुग्णालयात उपचारादरम्यान निधन झाले. त्यांच्या निधनाने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

दि. 5 मार्च रोजी त्यांना अचानक हृदयविकाराचा त्रास झाल्याने तातडीने उपचारासाठी अंबाजोगाई येथील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मात्र उपचार सुरु असतानाच त्यांची प्राणज्योत मालवली.

त्यांचा दफनविधी चांदापूर रोडवरील जुन्या कब्रस्तानमध्ये शोकाकुल वातावरणात करण्यात आला. निधनसमयी त्यांचे वय 60 वर्षे होते.

त्यांच्या पश्चात आई, पत्नी, एक मुलगा, एक मुलगी, दोन भाऊ व एक बहिण असा परिवार आहे. परळी येथील राष्ट्रवादी काँग्रेस (अजितदादा पवार गट) चे कार्यकर्ते मजाज इनामदार यांचे ते मोठे बंधू होत. त्यांच्या निधनाने कुटुंबीयांसह मित्रपरिवार व परिचितांमध्ये शोककळा पसरली आहे. इनामदार कुटुंबीयांवर कोसळलेल्या दु:खात दैनिक परळी संघर्षनेता परिवार सहभागी आहे.

# माजी मंत्री तथा आ.धनंजय मुंडे यांच्या नेतृत्वात नागापूर पंप हाऊसची साफसफाई; सभापती सौ.जयश्रीताई रवींद्र गित्ते यांचा पुढाकार

- परळी शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या नागापूर येथील पाणी पुरवठा पंप हाऊस व परिसराची साफसफाई सुरु; परळीकरांना मिळणार शुद्ध व सुरळीत पाणी





परळी वैजनाथ (प्रतिनिधी) :- परळी वैजनाथ शहराच्या पाणी पुरवठ्याचा मुख्य आधार असलेल्या नागापूर येथील पाणी पुरवठा पंप हाऊसची मोठ्या प्रमाणावर साफसफाई व दुरुस्तीची कामे करण्यास सुरुवात करण्यात आली. अनेक दिवसांपासून प्रलंबित असलेली ही कामे परळी नगर परिषदेच्या पाणी पुरवठा विभागाच्या सभापती सौ.जयश्रीताई रवींद्र गित्ते यांच्या पुढाकाराने पूर्ण करण्यात आली. शहरातील नागरिकांना सुरळीत आणि शुद्ध पाणी मिळावे या उद्देशाने ही स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.

परळी वैजनाथ शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या वाण धरण परिसरातील नागापूर पंप हाऊस हे पान 3 वर



# न्याय व्यवस्थेतील दीपस्तंभ : ॲड.दिलीप (मामा) उजगरे



महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारातील स्वाभिमानी समाज घडवून त्यांच्या न्याय-हक्कांसाठी लढण्यासाठीच जीवन समर्पित करणारे विधिज्ञ म्हणजेच आदरणीय ॲड. दिलीप ( मामा)उजगरे. परमपूज्य डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी आम्हाला सांगितले होते की तन-मन-धन समाजाच्या हितासाठी खर्च करा...! डॉ.बाबासाहेबांचा तोच संदेश आमलात आणून ॲड.दिलीप उजगरे मामा सामाजिक कार्यात सक्रिय आहेत. दिन-दलित-दुर्बल घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी स्वत:ला झोकून देवून काम करणारे वकील म्हणून त्यांची ख्याती आहे. ॲड.दिलीप उजगरे यांच्यासारख्या स्वाभिमानी भीम अनुयायांच्या भक्कम साथीमुळेच गोरगरीब लोकांना न्याय मिळत आहे.न्याय व्यवस्था,सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, आर्थिक, कृषी, ऐतिहासिक, सांस्कृतिक प्रश्नांची जाण असणारा,

उच्चविद्याविभूषित वकील काय करु शकतो? या सर्व प्रश्नांची उत्तरे म्हणजे ॲड.दिलीप (मामा)उजगरे आहेत.

बुद्ध-शिवराय-फुले-शाहू-आंबेडकर-माता रमाई या महामानवांच्या जयंती सोबतच समाजोपयोगी विधायक उपक्रम राबविण्याचा ॲड.उजगरे यांचा मानस आहे. प्रामाणिकपणे काम करणे आणि जिद्द हे आपल्या उत्साहाचे रहस्य असल्याचे सांगतात. काळानुसार बदलले पाहिजे. असे त्यांचे ठाम मत आहे. सोशल मीडियावर ते सक्रिय असतात. सोशल तर मीडियावर त्यांचा खूप मोठा चाहतावर्ग आहे. त्यांचा जनसंपर्क खूप दांडगा आहे. सामाजिक व कायदा या दोन्ही क्षेत्रात ॲड.उजगरे मामा यांचे नाव आदरपूर्वक घेतले जाते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रेरणेतून त्यांनी वकिली व्यवसायात पदार्पण केले.आजपर्यंत त्यांनी असंख्य केस लढल्या. त्यासाठी त्यांनी प्रचंड संघर्ष करून अफाट मेहनत घेतली. प्रत्येकाला न्याय मिळावा यासाठी त्यांची धडपड सुरू असते. त्यांच्या अनेक केसेस गाजल्या आहेत. विधी क्षेत्रात त्यांचे मोलाचे योगदान आहे. त्यांनी आपल्या वकिलीला एक नवा आयाम दिला आहे.सर्वसामान्य माणसाचे हक्काचे वकील अशी त्यांची जनमानसातील प्रतिमा आहे.

शालेय तसेच महाविद्यालयीन जीवना पासून त्यांना दलित पँथर चळवळीचे आकर्षण होते. त्यात त्यांनी सक्रिय सहभाग घेऊन अनेक आंदोलने केली. विद्यार्थ्यांना स्कॉलरशिप मिळवून देण्यासाठी त्यांनी लढा उभारला. डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ नामांतर लढ्यातील त्यांचे योगदान महत्वपूर्ण आहे. या कट्टर भीमसैनिकाने जेलभरो आंदोलनातही सहभाग घेतला होता.राजकीय ऑफर नाकारुन या स्वाभिमानी भीमसैनिकाने आपला लढा उभारला आहे. वाचन,लेखन, वक्तृत्व अभिनय, संगीत व गायनाची आवड असल्याने हे सर्व छंद चांगल्या प्रकारे ते जोपासत आहेत. ह्या मधून त्यांना समाधान मिळते. आम्हा सर्व कलावंतांना नवी ऊर्जा देण्याचं काम ते करत असतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते की, "मी सांस्कृतिक युद्धावर आहे".हे युद्ध आपणांस कलावंत म्हणून लढायचे आहे आणि तुमच्या सोबतीला मी आहे असा खंबीर पाठिंबा ते आम्हाला देतात. जगातल्या विविध प्रश्नांची उकल ते करतात. आमची विविध सामाजिक-राजकीय-सांस्कृतिक प्रश्नांवर चर्चा सुरु असते. मोठा भाऊ या नात्याने ॲड.दिलीप उजगरे मामा आम्हाला अनमोल मार्गदर्शन करतात. ते आमचे दीपस्तंभ आहेत.

जे अशक्य आहे ते शक्य करण्याचा नेहमीच ते प्रयन्त करतात " म्हणूनच ते एक सामाजिक योद्धे या नावे ओळखले जातात. ॲड.दिलीप उजगरे यांच्या सारख्या दिलदार , प्रयन्तवादी, वैचारिक , सामाजिक , व्यक्तीमत्वाचा सहवास आणि मार्गदर्शन आम्हाला मिळते. हे आमचे अहोभाग्यच.माणसाच्या मनात जिद्द असेल, काही सकारात्मक ध्येय असेल, तर तो कधीच थकत नाही, कधीच थांबत नाही. याचे उत्तम उदाहरण म्हणजे ॲड. दिलीप उजगरे मामा.

वकील म्हणून जनसेवा करण्याचे कारण, सांगताना ॲड.उजगरे मामा म्हणतात.."गोरगरिबांच्या वस्तीत आजही गरिबांची मुलं अजाणतेपणे गुन्हेगारीत गोवली जातात. त्यांना माणुसकीच्या नात्याने कायदेशीर सल्ला देणारे कुणीही हक्काचे असे नसते. वस्तीपातळीवरच्या आयाबाया दिवसरात्र राबतात. पण, त्यातल्या कित्येक जणींना घरगुती हिंसेचे बळी व्हावे लागते. या मायभगिनींना न्याय मिळवून देण्यासाठी आपण हक्काचा वकील व्हावे,त्यांना मान सन्मान मिळवून द्यावा यासाठीच मी या क्षेत्रात कार्यरत आहे". ॲड.उजगरे मामा यांच्या सारखा कर्तृत्ववान वकील समाजाला लाभला आहे याचा आम्हाला सार्थ अभिमान आहे.

प्रज्ञासूर्य डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शिक्षणासंदर्भातले, मानवी हक्कासंदर्भातले विचार ते जनमानसात रुजवत असतात. 'शिका, स्वावलंबी व्हा, आपण सगळे भारतीय आहोत, बाबासाहेबांनी संविधानामध्ये जे हक्क आणि अधिकार आपल्याला दिले आहेत, ते जाणून घ्याच. पण, आपल्यासाठी संविधानामध्ये जी मार्गदर्शक तत्वे आहेत, त्याबाबतही विचार करा,' अशी मांडणी आपल्या वक्तव्यातून ते सातत्याने करत असतात. वस्तीतील गरजू मुलांना शिक्षणाची प्रेरणा मिळावी, त्यांना काही अडीअडचण असेल, तर ती दूर करण्यासाठी ॲड. दिलीप उजगरे सदैव तत्पर असतात.

विधिज्ञ दिलीप उजगरे म्हणतात की,न्यायाचा समानार्थी शब्दच मुळात 'जयभीम' आहे,हे इथल्या प्रत्येक नागरिकाने लक्षात घेतले पाहिजे व त्यासाठी कुठलाही पूर्वग्रह मेंदूत न ठेवता डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी निर्माण केलेल्या भारतीय संविधानाचा प्रत्येक भारतीयाने यथार्थ गौरव केला पाहिजे.सत्याची ताकद, प्रामाणिकपणा, संवेदनशिलता, तत्वांशी असणारी बांधिलकी काय असते व त्याचा प्रभाव किती असतो हे अनुभवायचे असेल तर विधिज्ञ दिलीप उजगरे यांच्याशी संवाद साधला पाहिजे. आम्ही कायम त्यांच्या संपर्क-सानिध्यात असतो आणि समृद्ध होतो.!

विधिज्ञ ॲड.दिलीप उजगरे म्हणतात,आपली बाजू सत्य असेल व आपण शेवट पर्यंत खंबीर आणि आपल्या मतावर ठाम राहिल्यास आपला विरोधक कितीही शक्तीशाली असला तरी तुम्हांला न्याय मिळवून देण्याची धमक या देशाच्या संविधानात आहे,म्हणजेच "सिर्फ कानून ही मेरा हाथियार है!" असा त्यांना दृढ आत्मविश्वास आहे.

व्यवस्थेने बहिष्कृत केलेल्या, गावकुसाबाहेर फेकलेल्या इथला मुलनिवासी 'माणूस' समूहासाठी आणि इथल्या 'इंडियातल्या' लोकांसाठी भारतीय संविधानांनुसार कायदा सारखाच आहे हे,हाच संदेश विधिज्ञ ॲड. दिलीप उजगरे मामा आम्हाला देतात.

व्यवस्थेला भिडणाऱ्या गरीबांच्या मसिहाने अर्थातच सर्वप्रिय सन्मित्र मार्गदर्शक ॲड.दिलीप (मामा) उजगरे यांनी वकील म्हणून अणि सर्वांचा मित्र बनून अमीट असा ठसा उमटवला आहे. तो कायम राहो, त्यांना उत्तम आरोग्य आणि त्यांची मानवतावादी संवेदना लौकिकार्थाने सर्वदूर होवो, हीच सदिच्छा!आदरणीय मामांना जन्मोत्सवाच्या स्वाभिमानी-सम्यक मंगलकामना! 🞎 🞎 🞎 🞎

**प्रा. डॉ. सिद्धार्थ आबाजी तायडे**
**(सिने-नाटय लेखक-अभिनेता-दिग्दर्शक-समीक्षक तथा सामाजिक-सांस्कृतिक चळवळीचे संशोधक-अभ्यासक)मो.9822836675**



# संत एकनाथांची अभंगवाणी : तणावमुक्त जीवनाची गुरुकिल्ली




महाराष्ट्राच्या मातीमध्ये संत विचाराचा मळा फुलला होता . . . बहरला होता ;आजही त्यांच्या विचाराचा गंध दरवळतो आहे.आपल्या विचाराने मराठी मन समृद्ध आणि संपन्न करण्याचं काम सर्व संतांनी केलं होतं.त्यात संत ज्ञानेश्वरापासून संत तुकाराम व निळोबारायापर्यंत यांचे योगदान अनन्यसाधारण आहे.याच मालिकेतले संत एकनाथ हे त्यापैकी एक.भारुड,गवळणी, अभंग आदीसारख्या रचना करून मराठी साहित्याची सेवा तर त्यांनी केलीच; पण त्यातून व्यक्त झालेला विचार हा मराठी मनाची जडणघडण करणारा आहे.वर्तमान स्थितीतील असंख्य प्रश्नांची उत्तरे संत साहित्यात आढळतात.त्या संप्रदायातील संत एकनाथ यांचे विचारही वर्तमानात मोलाचे आहेत.

वर्तमान काळावर दृष्टीक्षेप टाकला तर हे युग वेग,स्पर्धा आणि अस्थिरतेचे युग आहे. विज्ञान तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे माणसाचे जीवन सुसह्य झाले असले तरी मन मात्र अधिकच अस्वस्थ झाले आहे.भौतिक सुख सुविधा वाढल्या;पण मन:शांती कमी झाली. अशा अस्थिर आणि तणावग्रस्त काळात संतपरंपरेचे विचार आपल्याला जीवनाचा खरा मार्ग दाखवतात.संत एकनाथांचे विचारही आजच्या तणावमुक्त जीवनासाठी अमृतवाणीच ठरतात.

भौतिक सुविधांमध्ये वावरणारा माणूस मात्र प्रचंड तणावग्रस्त आहे.त्याच्या अस्वस्थतेची व तणावाची कारणं ही बाह्य कमी तर त्याची स्वतःची अंतर्गतच जास्त आहेत.मत्सर,द्वेष,राग,लोभ हे मनाचे शत्रू माणसाला सतत अस्वस्थ करतात.मनातील हे शत्रूच बाह्य शत्रूपेक्षा अधिक भयंकर असतात. आजचा तणावग्रस्त समाज हा या अंतर्गत शत्रुनीच ग्रासलेला आहे.

"बाह्य शत्रूंचे अल्प दुःख
मन:शत्रूचे वर्म अशेख ॥"

संत एकनाथांनी केलेला हा शाब्दाविष्कार अगदी अलीकडच्या काळात अंतर्गत शत्रूंनी ग्रासलेल्या माणसांना तंतोतंत लागू पडतो. वि.स.खांडेकर यांनी 'अमृतवेल'या कादंबरीत केलेले -

"जीवनाचे खरे अमृत हे बाह्य सुखात नसून अंत:शांतीत असते." असे केलेले हे विधान संत एकनाथांच्या विचाराशी साधर्म्य साधूनच आहे. अंतरंग शुद्धी असेल तरच माणसाचं जगणं सुंदर होऊन जातं.

सध्याच्या काळात माणसाच्या अपेक्षा फार वाढलेल्या आहेत.अतिरिक्त अपेक्षा हेच दुःखाचे मूळ आहे.माणूस सतत असमाधानी असण्याचे कारण त्याच्या वाढत्या महत्त्वाकांक्षा व समाजात असलेली प्रचंड स्पर्धा हे होय.अशावेळी -

"आशेपायी नाही सुख
आशेपायी परम दुःख॥"

हा संत एकनाथांचा विचार आमच्या डोळ्यात अंजन घालून जातो.अपेक्षेच्या जंजाळात अडकलेला माणूस नैराशाच्या खोल गर्तेत जातो.अनावश्यक संकल्प - विकल्प मनाला थकवतात .म्हणूनच -

"न करी सायास आणि संकल्प
वायाची विकल्प न धरी मनी॥"

हा संत एकनाथांनी दिलेला मोलाचा संदेश आमच्या जीवनाला दिशादर्शक ठरतो. मनाला साधेपणाची सवय लावली तर मानसिक शांतता लाभते.पण हा साधेपणा सोडून वर्तमानात माणसं आभासी सुखासाठी प्रचंड धावपळ करताना दिसतात.अगदी समाज माध्यमावरील आपली लोकप्रियता वाढावी यासाठी त्यांची चाललेली धावपळ पाहून कीव येते.आज-काल फेसबुक, इन्स्टा,एक्स आदीसारख्या समाजमाध्यमावर टाकलेल्या आपल्या पोस्टला लाईक्स किती मिळाल्या. यावर आभासी सुख शोधतात.लाईक्स कमी मिळाल्या तर दुःखी होतात व आपल्याच माणसाविषयी राग धरतात.छोट्या छोट्या कारणावरून अलीकडच्या काळात क्रोधाचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढलेले दिसते. मानसशास्त्रीयदृष्ट्या विचार केला तर 'क्रोध' हे सुद्धा नैराश्याचे व दुःखाचे मूळ कारण आहे. क्रोधामुळे माणसाच्या आयुष्यातील तणाव वाढत जातो.यावर -

"काम क्रोधाचा उफाडा
शांती क्षमेचा दिला काढा
देता नाममात्र रसायन
प्रपंच रोग झाला क्षीण॥"

असा संत एकनाथांनी राग आणि क्रोधावर शांती व क्षमा हा औषधोपचार सांगितला आहे. जसे शरीराला औषध लागते तसे मनालाही नामस्मरण आणि क्षमेचे औषध आवश्यक असते हे तत्त्व आजच्या तणावग्रस्त जीवनात अत्यंत उपयुक्त ठरते.क्रोधाच्याऐवजी क्षमा व मनःशांतीबाबत संत एकनाथांच्या जीवनातील एक प्रसंग विशेष लक्षात घेण्यासारखा आहे.पैठण नगरीमध्ये सकाळच्या प्रहारी गोदावरी पात्रातून स्नान करून आलेल्या संत एकनाथांच्या अंगावर एक दुष्ट माणूस थुंकतो.त्यावेळी त्याच्याविषयी कुठलाही राग मनामध्ये न धरता ते पुन्हा स्नानासाठी गोदावरी पात्रावर जातात.पुन्हा स्नान करून आल्यानंतर पुन्हा तो दुष्ट माणूस त्यांच्या अंगावर थुंकतो.असे जवळपास 108 वेळा घडते.त्यावेळी तो दुष्ट माणूस संत एकनाथांना म्हणतो, "मी इतक्या वेळा तुमच्या अंगावर थुंकले तरी तुम्हाला राग नाही आला." त्यावेळी संत एकनाथांनी दिलेले उत्तर अतिशय मार्मिक होते.ते म्हणतात - "आपल्यामुळे आज मला 108 वेळा स्नान करण्याचे भाग्य मिळाले.अगदी संत एकनाथांचे हे वर्तन म्हणजे "विश्वरागे झाले वन्हीlसंती सुखे व्हावे पाणी"महातेजस्वी मुक्ताबाई यांच्या अभंगातील या विचाराप्रमाणेच होते. उलट'विवाद वाद हे अधम लक्षण 'अशी त्यांची भूमिका आहे.म्हणून वादविवाद,अविश्वास यापासून दूर राहण्याचा संदेश संत एकनाथांनी आपल्या रचनेतून दिलेला आहे.याद्दष्टीने -

"अविश्वासा घरी
विकल्प नांदे निरंतरी ॥"

असे म्हणून विश्वास आणि समन्वय यांना त्यांनी महत्त्व दिलेले आहे.संशय आणि वाद ही मनाला अस्वस्थ करतात. मात्र परस्परांवर विश्वास ठेवणारे समाजजीवन तणावमुक्त असते.

वर्तमान स्थितीमध्ये समाजातील बहुसंख्य घटक हा विषय सुखाच्या पाठीमागे लागलेला आहे.विषयासक्तीचे दुःख मोठे असते.अगदी संत एकनाथांच्या रचनेत लक्षात घ्यावयाचे म्हटले तर -

"विषयाच्या व्यथे दुःख भोगितो अघोर।
तया दुजा थार कोठे नाही॥"

असा भाव व्यक्त होताना दिसतो.इंद्रिय सुखांच्या अतिरेकामुळे मन अस्थिर होते. या अस्थिरतेतून अनेकांनी आपलं आयुष्य उध्वस्त करून घेतलं आहे.अशास्थितीत संत एकनाथांनी - 'संयम आणि विवेकाने जगले तर जीवन संतुलित राहते.' हा दिलेला संदेश उध्वस्त आयुष्याला उभारी देणारा ठरतो.

आजच्या सोशल मीडियाच्या काळात त्याचबरोबर दैनंदिन व्यवहारात एकमेकाची निंदा करणे,द्वेष करणे,असूया,मत्सर या अपप्रवृत्ती मोठ्या प्रमाणात वाढल्याचा प्रत्यय येतो.दुसऱ्याची निंदा करणे म्हणजे स्वतःच्या मनात विष साठवणे होय.संत एकनाथांनी निंदेपासून दूर राहून आपले मन विशाल करण्याचा दिलेला सल्ला लाख मोलाचा आहे -

"दुजियाची निंदा नको रे करू मना॥"

दुसऱ्यांच्या दोषापेक्षा स्वतःच्या सुधारण्याकडे पाहण्याचा त्यांनी दिलेला विचार संदेश वर्तमानात जगणाऱ्या माणसाला तणावमुक्त करतो.खरे तर माणसाच्या अंतरंगात असलेले हे षढरिपू हेच त्याच्या शोकात्मिकेचे मूळ ठरतात.म्हणून संत एकनाथांनी मनाची प्रसन्नता याला प्राधान्य दिले आहे.

"मन मनाशी होय प्रसन्न
तेव्हा वृत्ती होय निरभिमान॥"

मन प्रसन्न असेल तर जीवनातील कठीण प्रसंगही सहज स्वीकारता येतात.अहंकाराचा त्याग करून साधेपणाने जीवन जगण्याचा व मन प्रसन्न ठेवण्याचा संत एकनाथाने दिलेला हा संदेश माणसाच्या मानसिक आरोग्याची गुरुकिल्लीच ठरतो.आधुनिक मानसशास्त्रही नेमकी हीच भूमिका मांडताना दिसते.म्हणून मध्ययुगामध्ये संत एकनाथांनी मांडलेले हे विचार आमच्या आजच्या माणसाला जीवन जगण्यासाठी आणि त्या जीवनाला दिशा देण्यासाठी मोठे वरदान आहेत.

संत एकनाथांचे अभंग हे केवळ भक्तीचे गीत नाहीत;ते जीवनशास्त्राचे सार आहेत.त्यांनी मन:शांती,संयम,क्षमा,समाधान आणि विश्वास यांचा जो मार्ग दाखवला आहे,तोच तणावमुक्त जीवन जगण्याचा खराखुरा मार्ग आहे.

आजच्या धावपळीच्या युगात जर माणसाने संत एकनाथांच्या विचारांचे अनुसरण केले तर जीवनातील तणावाचे ढग दूर होतील आणि मनाच्या आकाशात समाधानाचा चंद्र उगवेल.अशा संतविचारांच्या प्रकाशात जगणारा माणूसच खऱ्या अर्थाने शांत,समाधानी आणि तणावमुक्त जीवनाचा अनुभव घेऊ शकतो. कारण शांत मनातच आनंदाची फुले उमलतात आणि समाधानाची सुगंधी झुळूक वाहू लागते. संत एकनाथांच्या विचारानुसार तणावाच्या सावल्या बाजूला टाकून समाधानाचा प्रकाश आपल्या आयुष्यात प्रकाशमान केला तर निश्चितच वर्तमान माणसाच्या आयुष्यात सोनेरी किरणेच पाहायला मिळतील.वर्तमान माणसाला हा सोनेरी किरणाचाच अनुभव यावा ही 'एकनाथ षष्ठी'निमित्त मनोकामना ... !



**प्रा.डॉ.राजकुमार यल्लावाड**
**कै.लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालय,परळी**

# संख्याबळाचा अहंकार : लोकशाहीत बहुमत पुरेसे आहे का?



**डॉ. भारत कऱ्हाड**

लोकशाही व्यवस्थेचा मूलभूत आधार म्हणजे जनतेची इच्छा आणि त्या इच्छेचे प्रतिनिधित्व करणारी निवडणूक प्रक्रिया. निवडणुकांद्वारे जनतेने दिलेल्या मतांमुळे एखाद्या पक्षाला किंवा आघाडीला बहुमत मिळते आणि त्या आधारे सरकार स्थापन होते. त्यामुळे बहुमताला लोकशाहीतील वैधता प्राप्त होते. परंतु एक महत्त्वाचा प्रश्न नेहमीच उपस्थित होतो—लोकशाहीत केवळ बहुमत पुरेसे आहे का? संख्याबळ मिळाल्यानंतर त्यातून निर्माण होणारा अहंकार लोकशाहीच्या मूल्यांना बाधा तर आणत नाही ना?

लोकशाहीत बहुमताला निर्णय घेण्याचा अधिकार असतो. शासन चालवणे, धोरणे ठरवणे, कायदे करणे या सर्व प्रक्रिया बहुमताच्या आधारे पार पडतात. परंतु लोकशाही ही केवळ संख्येची खेळ नाही. ती विचारांची देवाणघेवाण, सहमती, संवाद आणि संस्थांचा आदर यांवर टिकून असते. त्यामुळे बहुमत मिळाल्यानंतरही सत्ताधारी पक्षाने संयम, सहिष्णुता आणि लोकशाही मूल्यांचे पालन करणे आवश्यक असते. जेव्हा बहुमताच्या जोरावर विरोधकांचे मत दुर्लक्षित केले जाते किंवा निर्णय घाईघाईने पुढे नेले जातात, तेव्हा त्या प्रक्रियेत लोकशाहीचा आत्मा कमकुवत होऊ लागतो.

भारतीय संसदीय व्यवस्थेत संसद ही जनतेच्या प्रतिनिधींचे सर्वोच्च व्यासपीठ मानली जाते. अनेकदा संसदेला "लोकशाहीचे मंदिर" असे संबोधले जाते. येथे सत्ताधारी आणि विरोधक यांच्यातील चर्चा, वादविवाद आणि विचारमंथनातून देशाच्या धोरणांना दिशा मिळते. परंतु अलीकडील काळात संसदेतील कामकाजावरून वारंवार वाद निर्माण होताना दिसतात. काही वेळा सत्ताधाऱ्यांवर बहुमताच्या आधारावर विधेयके घाईघाईने मंजूर केल्याचा आरोप होतो, तर काही वेळा विरोधकांवर सभागृहात गोंधळ घालून कामकाज ठप्प करण्याची टीका होते. या दोन्ही प्रवृत्ती संसदीय संस्कृतीसाठी घातक ठरतात.

लोकशाही व्यवस्थेत विरोधकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. विरोधक हे केवळ सत्ताधाऱ्यांचे टीकाकार नसतात; ते लोकशाहीतील संतुलन राखणारे घटक असतात. सरकारच्या धोरणांवर प्रश्न विचारणे, त्रुटी दाखवून देणे आणि पर्यायी धोरण सुचवणे ही त्यांची जबाबदारी असते. विरोधकांची भूमिका कमकुवत झाली तर लोकशाही हळूहळू एकतर्फी निर्णयप्रक्रियेच्या दिशेने जाऊ शकते. त्यामुळे सत्ताधाऱ्यांनी विरोधकांच्या मताचा आदर करणे आणि त्यांना चर्चेची संधी देणे हे लोकशाहीच्या आरोग्यासाठी आवश्यक आहे.

त्याच वेळी विरोधकांवरही काही जबाबदाऱ्या असतात. संसदेतील गोंधळ, घोषणाबाजी आणि सततचे कामकाज ठप्प करणे या गोष्टींमुळे लोकशाही प्रक्रियेचे नुकसान होते. संसद ही राजकीय संघर्षाचे रणांगण नसून जनतेच्या प्रश्नांवर उपाय शोधण्याचे व्यासपीठ आहे. त्यामुळे विरोधकांनीही विधायक भूमिका घेऊन पर्यायी धोरणे आणि रचनात्मक सूचना मांडणे आवश्यक आहे.

संख्याबळाचा अहंकार वाढला की शासनपद्धतीवर त्याचे परिणाम दिसून येतात. काही वेळा निर्णयप्रक्रिया केंद्रीत होऊ लागते. काही मोजक्या व्यक्तींमध्ये अधिकार एकवटतात. चर्चा आणि सल्लामसलत यांना दुय्यम स्थान मिळते. यामुळे धोरणांमध्ये व्यापक सहमती निर्माण होत नाही. परिणामी समाजात ध्रुवीकरण वाढण्याची शक्यता असते. लोकशाहीची ताकद विविध मतप्रवाहांच्या सहअस्तित्वात असते; परंतु अहंकार वाढला की ही विविधता संघर्षात बदलू शकते.

अशा परिस्थितीत अनेकदा असा प्रश्न उपस्थित होतो की देशातील संवैधानिक संस्था हस्तक्षेप का करत नाहीत. भारतीय संविधानात राष्ट्रपती, न्यायपालिका आणि इतर संस्था यांना स्वतंत्र स्थान दिले आहे. परंतु संसदेतील दैनंदिन कामकाज चालवण्याची जबाबदारी मुख्यतः सभापती, अध्यक्ष आणि सरकार यांच्यावर असते. त्यामुळे संसदीय परंपरा टिकवण्याची जबाबदारीही प्रामुख्याने राजकीय नेतृत्वावरच असते.

लोकशाहीत माध्यमे आणि नागरी समाज यांची भूमिकाही महत्त्वाची असते. माध्यमांनी तथ्याधारित चर्चा पुढे आणणे, सरकारच्या निर्णयांचे परीक्षण करणे आणि जनतेच्या प्रश्नांना वाचा फोडणे आवश्यक असते. त्याचप्रमाणे नागरिकांनीही लोकशाही प्रक्रियेत सक्रिय सहभाग ठेवणे गरजेचे आहे. मतदान हा नागरिकांचा सर्वात महत्त्वाचा अधिकार आहे. निवडणुकांमधूनच सरकार बनते आणि बदलते. त्यामुळे मतदानाची किंमत कधीच कमी होत नाही.

लोकशाहीची गुणवत्ता केवळ निवडणुकीच्या निकालावर अवलंबून नसते. निवडून आलेल्या प्रतिनिधींची वृत्ती, संस्थांची स्वायत्तता, माध्यमांची जबाबदारी आणि नागरिकांची जागरूकता या सर्व घटकांवर लोकशाही टिकून असते. बहुमत मिळाल्यानंतर सत्ताधाऱ्यांनी हे लक्षात ठेवले पाहिजे की सत्ता ही तात्पुरती असते, परंतु संस्थांची प्रतिष्ठा कायमस्वरूपी असते. जर संसदेची प्रतिष्ठा कमी झाली तर त्याचा परिणाम संपूर्ण लोकशाही व्यवस्थेवर होतो.

आजच्या काळात लोकशाहीसमोर सर्वात मोठे आव्हान म्हणजे संवादाची कमी होत चाललेली परंपरा. राजकीय मतभेद असणे स्वाभाविक आहे, परंतु मतभेदांचा मार्ग संवादातून शोधला गेला पाहिजे. लोकशाहीत विरोधकांना स्थान देणे, समित्यांमध्ये सखोल चर्चा घडवून आणणे आणि सहमतीची संस्कृती वाढवणे ही काळाची गरज आहे.

शेवटी प्रश्न असा उरतो की लोकशाहीत बहुमत पुरेसे आहे का? उत्तर स्पष्ट आहे—बहुमत आवश्यक आहे, पण ते पुरेसे नाही. लोकशाही टिकवण्यासाठी संख्याबळासोबत संयम, सहिष्णुता, संवाद आणि संस्थांचा आदर या मूल्यांची आवश्यकता असते. जर बहुमताचा वापर अहंकाराने केला गेला तर लोकशाहीचा आत्माच कमकुवत होऊ शकतो.

लोकशाहीची खरी ताकद संख्याबळात नसून विचारस्वातंत्र्य, संवाद आणि जनतेच्या विश्वासात आहे. संसद ही त्या विश्वासाचे प्रतीक आहे. त्यामुळे सत्ताधारी आणि विरोधक या दोघांनीही हे लक्षात ठेवले पाहिजे की लोकशाहीचे खरे यश केवळ निवडणूक जिंकण्यात नसून जनतेच्या विश्वासाला न्याय देण्यात आहे.

**डॉ. भारत कऱ्हाड, प्राचार्य, वराडकर महाविद्यालय दापोली, जिल्हा रत्नागिरी.**

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक मोहन भागुजीराव व्हावळे यांनी मातोश्री ऑफसेट मोंढा जवळ, परळी वैजनाथ, परळी ता. परळी, जि.बीड 431515 (महाराष्ट्र ) येथे छापून साप्ताहिक परळी संघर्षनेता, कार्यालय, मोहन भागुजीराव व्हावळे, इंदिरा नगर ता. परळी वैजनाथ जि.बीड पिन कोड 431515 (एम.एस.) येथे प्रकाशित केले आहे. मोबा. 9881265102, पीआरबी ॲक्ट नुसार या अंकातील प्रकाशित झालेल्या मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. या संबंधीत वाद परळी वैजनाथ न्यायालया अंतर्गत parlisangharshneta@gmail.com , mohanvhavale1111@gmail.com

## पान 1 वरुन

यांनी केली. त्यासाठी अर्थसंकल्पात स्वतंत्र तरतूद करण्यात आलेली नाही. प्राथमिक अंदाजानुसार कर्जमाफी तसेच नियमित कर्ज भरणाऱ्यांना 50 हजार रुपयांचे सहाय्य करण्याच्या निर्णयाच्या अंमलबजावणीसाठी सुमारे 35 हजार कोटी रुपये खर्च होणार आहे. या रक्कमेचा बोजा आणखी पडणार आहे.महसुली तूट – 40,552 कोटीराजकोषीय तूट – 1 लाख, 50 हजार कोटीकर्ज – 11 लाख, 02 हजार कोटीकर्जावरील व्याज फेडण्यासाठी – 70 हजार कोटी

-----------------------------------

नागपूर आणि पश्चिम महाराष्ट्रात मिरज या दोन मोठ्या रेल्वे जंक्शनमधील अंतर 911 किमीवरून 807 किमीवर येईल. म्हणजेच सुमारे 184 किमीचे अंतर कमी होईल. याचा थेट फायदा विदर्भ आणि शेजारील छत्तीसगड, मध्यप्रदेशातील बिलासपूर व जबलपूर सारख्या शहरांना पश्चिम किनारपट्टीकडे जाण्यासाठी होईल.महाराष्ट्र सरकारने या प्रकल्पाच्या खर्चात आपला 50 टक्के वाटा उचलण्याचे आधीच मान्य केले आहे. या प्रकल्पाचा 'फायनल लोकेशन सर्व्हे' देखील पूर्ण झाला असून, प्रस्ताव रेल्वे मंत्रालयाकडे प्रलंबित आहे. केंद्र सरकारने याला तातडीने मंजूरी दिल्यास राज्याच्या आर्थिक विकासाला मोठी गती मिळेल, अशी भूमिकाही अशोक चव्हाण यांनी संसदेत मांडली.

-------------------------

गटाचे नेते अंबादास दानवे यांनी केला. या सर्व घडामोडी सविस्तर जाणून घेऊ...मंत्री संजय शिरसाट यांच्या सामाजिक न्याय विभागात कोट्यवधींचा घोटाळा झाल्याचा आरोप मनसेचे नेते अविनाश जाधव यांनी केला. त्याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहून त्यांनी चौकशीची मागणीही केली. त्यांच्या या आरोपांमुळे राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली. अविनाश जाधव यांनी आपल्या पत्रात संजय शिरसाट यांच्या कार्यालयातील खासगी सचिव भरत कदम यांच्यावर गंभीर आरोप केले. विभागात विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून काम करणारे सिद्धार्थ भंडारे हे कोणत्याही अधिकृत आदेशाविना कार्यरत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. सामाजिक न्याय विभागात अलीकडील काळात गंभीर अनियमितता असल्याच्या तक्रारी आहेत. विशेषतः विविध योजनांमधील निधी वितरण प्रक्रियेत घोळ झाल्याचा आरोप करण्यात येत आहे. विद्यार्थ्यांच्या वसतिगृह व वसतिगृहाशी संबंधित कामांमध्ये ऑनलाईन निविदा प्रक्रियेच्या नावाखाली आगाऊ रक्कम घेऊन कामांचे वाटप करण्यात आले असल्याचे जाधव यांनी पत्रात नमूद केले आहे.

-----------------------------------

करत, आयोगाचे अधिकार मंत्रालयाकडे असण्यावर आक्षेप घेतला. प्रश्नोत्तराच्या तासात सुधीर मुनगंटीवार (Sudhir Mungantivar) यांनी राज्य महिला आयोगाच्या कामाचा आढावा घेताना विचारले की, आयोगाला मंजूर झालेला निधी प्रत्यक्षात का मिळत नाही? आयोगाची एक महत्त्वाची फाईल गेल्या आठ महिन्यांपासून मंत्रालयात का पेंडिंग आहे, असा थेट सवाल त्यांनी केला. महिला आयोगाला स्वायत्तता असली, तरी प्रत्येक खर्चाच्या फाईलसाठी मंत्रालयाची परवानगी का लागते? यामुळे आयोगाचे संशोधन आणि जनजागृतीचे कार्यक्रम ठप्प झाले आहेत, असे त्यांनी नमूद केले.यावेळी सुधीर मुनगंटीवार यांनी आरोप केला की महिला आयोगाला निधी वेळेवर आणि पुरेसा मिळत नाही, ज्यामुळे जनजागृती आणि संशोधन कार्यावर परिणाम होत आहे. मुनगंटीवार यांनी फाईल्स मंजुरीसाठी मंत्रालयात पाठवण्याच्या प्रक्रियेवर आक्षेप घेतला. त्यासोबतच मंत्रालयाची परवानगी घेतली नसल्याचा आरोप देखील तयांनी सभागृहात केला.

----------------------------------------

लक्षवेधी मांडत असताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. आता या आमदार आणि मंत्र्यांच्या गैरहजेरीमुळे भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण हे नाराज असल्याचे सांगितले जात आहे. या पार्श्वभूमीवर रवींद्र चव्हाण बैठक घेणार असून या बैठकीत ते आमदार आणि मंत्र्यांचा क्लास घेणार आहेत.रवींद्र चव्हाण (Ravindra Chavan) यांनी मंगळवारी मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र आणि विदर्भातील सर्व आमदार आणि मंत्र्यांना तर बुधवारी पश्चिम महाराष्ट्र, ठाणे-कोकण आणि मुंबईमधील मंत्र्यांची बैठक आयोजित केली आहे. तसेच मंत्री चंद्रशेखर बावनकुळे हे देखील मार्गदर्शन करणार आहेत. यावेळी भाजपचे मंत्री व आमदारांना शिस्तीचे धडे देणार आहेत.

-----------------------------------------

दत्तात्रय गुट्टे यांच्या नेतृत्वात अनेक लढाया लढल्या गेल्या. कधी वेतनवाढीसाठी, कधी सेवानिवृत्तीच्या अटींसाठी, तर कधी कार्यस्थळी सुरक्षिततेसाठी त्यांनी आंदोलनाच्या रणभूमीत स्वतःला झोकून दिलं. शासन दरबारी ठामपणे भूमिका मांडत त्यांनी कर्मचाऱ्यांच्या हिताचे अनेक निर्णय अमलात आणले. या कृतींमुळे वीज कर्मचाऱ्यांच्या हजारो कुटुंबांना केवळ आर्थिक सुरक्षाच नव्हे, तर आत्मसन्मानाचा नवा श्वास मिळाला. केवळ संघटन नेते म्हणूनच नव्हे, तर ऊर्जा व्यवस्थापनात नवकल्पना राबवणारे सजग धोरणकर्तेही आहेत. 'ऊर्जा बचत अभियान', 'वीज गळती नियंत्रण उपक्रम', 'कामगार कल्याण निधी' यांसारख्या योजनांतून त्यांनी वीज विभागाची कार्यक्षमता आणि जनहितसन्मुखता वाढवण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न केले. त्यांचं स्पष्ट मत आहे की, "ऊर्जा ही राष्ट्राची जीवनवाहिनी आहे, आणि वीज कर्मचारी हे तिचं धडकणारं हृदय."

दत्तात्रय गुट्टे हे एक नाव नव्हे, तर शिस्त, आदर्श, संघर्ष, आणि प्रेरणा यांचं व्यावहारिक उदाहरण आहे. नेतृत्व म्हणजे काय, शिस्त म्हणजे काय, आणि संघटना म्हणजे कसं कुटुंब असतं – हे त्यांनी आपल्या कृतीतून दाखवून दिलं आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक युवा संघटक तयार झाले, आणि वीज कर्मचारी संघटनेला नवसंजीवनी मिळाली.

दत्तात्रय गुट्टे यांना नुकताच 'लोकमत ग्लोबल कन्व्हेन्शन अँड अवॉर्ड 2025' हा अतिशय मानाचा आणि प्रतिष्ठेचा जागतिक पुरस्कार हाँगकाँगमध्ये प्रदान करण्यात आला. प्रसिद्ध अभिनेते सोनू सूद यांच्या हस्ते झालेला हा सन्मान केवळ एका व्यक्तीचा नव्हता, तर तो महाराष्ट्रातील लाखो वीज कामगारांच्या संघर्षाचा, आत्मविश्वासाचा आणि नेतृत्वाच्या ओजस्वी प्रवासाचा जागतिक गौरव झाला.

वीज कामगार काँग्रेस इंटकचे मुख्य महासचिव दत्तात्रय गुट्टे यांना 'विद्यावाचस्पती (मानद डॉक्टरेट)' जाहीर झाली असून ही मानाची पदवी त्यांना दि. 17 एप्रिल 2026 रोजी, प्रधानमंत्री संग्रहालय, तीन मुर्ती मार्ग, नवी दिल्ली येथे आयोजित करण्यात आलेल्या भव्य पदवीदान समारंभात विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत प्रदान करण्यात येणार आहे. या समारंभात देशभरातील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना सन्मानित करण्यात येणार असून त्यामध्ये दत्तात्रय गुट्टे यांचा समावेश होणे ही महाराष्ट्रातील कामगार चळवळीसाठी अभिमानाची बाब मानली जात आहे.

दत्तात्रय गुट्टे यांनी अनेक वर्षे कामगारांच्या हक्कांसाठी सातत्याने लढा देत त्यांचे प्रश्न शासन व प्रशासनापर्यंत पोहोचविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले आहे. वीज क्षेत्रातील कामगारांच्या समस्या, सेवा अटी, सुरक्षितता, वेतन व सामाजिक सुरक्षा या प्रश्नांवर त्यांनी ठामपणे भूमिका घेत कामगारांना न्याय मिळवून देण्यासाठी अथक प्रयत्न केले आहेत. त्यांच्या नेतृत्वाखाली अनेक कामगार चळवळींना दिशा मिळाली असून संघटनात्मक बळकटी वाढविण्यात त्यांचा मोठा वाटा राहिला आहे.

कामगारांच्या हितासाठी संघर्ष करताना त्यांनी सामाजिक बांधिलकी जपत समाजातील विविध घटकांशी सलोखा राखला आहे. कामगारांच्या समस्या सोडविताना संवाद, संघटनशक्ती आणि सकारात्मक मार्गाने लढा देण्याची त्यांची शैली अनेकांसाठी प्रेरणादायी ठरली आहे. कामगार चळवळीतील त्यांचे कार्य केवळ संघटनापुरते मर्यादित न राहता सामाजिक जाणीव, पर्यावरण संरक्षण व समाजहिताच्या विविध उपक्रमांमध्येही त्यांनी सक्रिय सहभाग घेतला आहे. त्यांच्या या दीर्घकालीन व निस्वार्थी कार्याची दखल घेत विश्व संस्कृती एवं पर्यावरण संरक्षण आयोगाने त्यांना 'विद्यावाचस्पती' या मानद पदवीने गौरविण्याचा निर्णय घेतला आहे. या सन्मानामुळे कामगार चळवळीतील कार्याला राष्ट्रीय स्तरावर मान्यता मिळाल्याची भावना व्यक्त होत आहे.

या मानाच्या सन्मानाची घोषणा झाल्यानंतर कामगार संघटना, सामाजिक संस्था, विविध क्षेत्रातील मान्यवर, सहकारी व कार्यकर्त्यांकडून श्री. दत्तात्रय दादाराव गुट्टे यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. त्यांच्या कार्याचा गौरव झाल्याने कामगार चळवळीतील कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून हा सन्मान भविष्यातील कार्यासाठी नवी प्रेरणा देणारा ठरणार आहे.

---------------------------------

नियमानुसार आरटीई अंतर्गत शाळेत प्रवेश मिळवायचा असेल तर विद्यार्थ्याच्या निवासस्थानापासून 1 किलोमीटर परिसरात असलेली शाळाच निवडता येत होती.आरटीई प्रवेशासाठी लागू करण्यात आलेल्या राज्य सरकारच्या एक किमीच्या निर्णयाला स्थगिती देण्यात आली आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने हा निर्णय दिला आहे. सरकारच्या नव्या नियमानुसार आरटीई अंतर्गत प्रवेशासाठी विद्यार्थ्याच्या निवासस्थानापासून 1 किलोमीटर परिसरातील शाळाच निवडता येत होती. सरकारच्या या निर्णयाला ॲड. बोधी रामटेके आणि ॲड दीपक चटप यांनी आव्हान देत नागपूर खंडपीठात याचिका दाखल केली होती. याच याचिकेवर सुनावणी घेतल्यानंतर न्यायालयाने हा निर्णय दिला आहे.

----------------------------------------

जलशुद्धीकरण प्रक्रियेचे महत्त्वाचे केंद्र आहे. येथून शुद्ध केलेले पाणी शहरातील विविध भागांत असलेल्या जलकुंभांमध्ये पाठवले जाते. त्यामुळे या पंप हाऊसची स्वच्छता व देखभाल अत्यंत महत्त्वाची मानली जाते. मागील काही दिवसांत येथे साचलेली घाण, शैवाल आणि कचरा यामुळे पंपाच्या कार्यक्षमतेवर परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली होती. ही बाब लक्षात घेऊन पाणी पुरवठा विभागाने तातडीने साफसफाईची मोहीम हाती घेतली. माजी मंत्री आ. धनंजय मुंडे यांच्या नेतृत्वाखाली आणि परळीच्या कर्तव्यदक्ष नगराध्यक्षा पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली ही कामे करण्यात आली. सभापती जयश्रीताई गित्ते यांनी स्वतः पुढाकार घेत नागापूर पंप हाऊस परिसरातील स्वच्छता, टाकी क्लीनिंग आणि यंत्रसामग्रीची कामे करून घेत आहेत. यामध्ये पंप हाऊस परिसरातील साचलेली घाण मऊ ब्रशच्या सहाय्याने साफ करण्यात आली. तसेच इम्पेलर आणि पाईप्समधील गाळ काढून संपूर्ण यंत्रणा स्वच्छ करण्यात आली. या साफसफाईदरम्यान नागापूर पंप हाऊस येथील 150 एचपी क्षमतेच्या पंपाचे बेरिंग व कपल सेट दुरुस्त करण्यात आले. काही तांत्रिक अडचणी दूर करून हा पंप पुन्हा पूर्ववत सुरु करण्यात आला. त्यामुळे पंपाची कार्यक्षमता वाढण्यास मदत झाली असून पुढील काळात पाणीपुरवठा अधिक सुरळीत होण्यास मदत होणार आहे.

दरम्यान, बीड ते परळी वैजनाथ रेल्वे लाईनच्या कामामुळे शहरातील पाणीपुरवठा करणारी मुख्य पाईप लाईन दुसऱ्या ठिकाणाहून टाकण्याचे काम सुरु आहे. या कामासाठी 9 ते 10 मार्च दरम्यान शहराचा पाणीपुरवठा तात्पुरता बंद ठेवण्यात आला होता. मात्र या दोन दिवसांच्या कालावधीचा योग्य उपयोग करून पाणी पुरवठा विभागाने नागापूर पंप हाऊसची स्वच्छता व किरकोळ दुरुस्तीची कामे सुरु करण्यात आली आहेत. पंप हाऊसची स्वच्छता केल्याने पंपाचे आयुष्य वाढते, कार्यक्षमता टिकून राहते आणि पाणीपुरवठा सुरळीत राहण्यास मदत होते. याशिवाय निर्जंतुकीकरण प्रक्रियेने पाणी अधिक स्वच्छ आणि सुरक्षित राहते. या सर्व कामांमुळे परळी शहरातील नागरिकांना पुढील काळात शुद्ध व अखंड पाणीपुरवठा मिळणार आहे. नागापूर पंप हाऊस येथे करण्यात आलेल्या या स्वच्छता आणि दुरुस्ती मोहिमेमुळे शहराच्या पाणीपुरवठा व्यवस्थेला नवसंजीवनी मिळाली असून परळीकरांसाठी ही एक दिलासादायक बाब ठरली आहे. नगर परिषद निवडणुकीनंतर पदभार स्वीकारल्यापासून पाणी पुरवठा विभागाची कामे अधिक गतीने आणि नियोजनबद्ध पद्धतीने सुरु आहेत. शहरातील पाणीपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी आवश्यक ती कामे सातत्याने करण्यात येत असून, या कामकाजाबद्दल परळीकर समाधान व्यक्त करत आहेत.

परळी शहरातील नागरिकांना स्वच्छ व सुरळीत पाणीपुरवठा मिळावा, हा आमचा मुख्य उद्देश आहे. नागापूर येथील पंप हाऊस हे शहराच्या पाणीपुरवठ्याचे महत्त्वाचे केंद्र असल्यामुळे त्याची स्वच्छता व दुरुस्ती करणे आवश्यक होते. पाणीपुरवठा दोन दिवस बंद असताना त्या वेळेचा उपयोग करून पंप हाऊसची साफसफाई, टाकी क्लीनिंग तसेच पंपाच्या काही तांत्रिक दुरुस्तीची कामे पूर्ण करण्यात आली. यामुळे पुढील काळात परळीकरांना अधिक शुद्ध आणि सुरळीत पाणीपुरवठा करता येईल, असा आम्हाला विश्वास आहे. पुढेही शहरातील पाणीपुरवठा व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी आवश्यक ती सर्व कामे प्राधान्याने करण्यात येतील अशी माहिती परळी वैजनाथ नगर परिषदेचे पाणी पुरवठा सभापती जयश्रीताई रवींद्र गित्ते यांनी दिली आहे.

---------------------------------

झाला आहे. नव्या निर्णयानुसार राज्यातील महापालिका आणि नगरपालिका क्षेत्रातील गायरान जमिनीवरील आरक्षण उठवण्यात आलं आहे.

## पान 4 वरुन

जाते. या योजनेचा मुख्य उद्देश शहरांमध्ये हरित क्षेत्र वाढविणे, जैवविविधतेचे संवर्धन करणे तसेच नागरिकांना पर्यावरणीय, शैक्षणिक आणि मनोरंजनात्मक लाभ उपलब्ध करून देणे हा आहे. मात्र, बीड जिल्ह्यात नागरी वन उभारणीसाठी महाराष्ट्र शासनाकडून अद्याप कोणताही प्रस्ताव केंद्र सरकारकडे प्राप्त झालेला नसल्याची माहिती राज्यमंत्र्यानी दिली. राज्य सरकारकडून प्रस्ताव प्राप्त झाल्यास, उपलब्ध जमीन आणि निधीच्या आधारे योजनेच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार त्यावर विचार केला जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. खा.बजरंग सोनवणे हे बीड जिल्ह्याच्या सर्वांगिण विकासाच्या दृष्टीने लोकसभेत आवाज उठवत असल्याचे वारंवार दिसत आहे.पर्यावरणीय समतोल राखणे, पावसाचे प्रमाण वाढविणे आणि जलसंवर्धन या बाबी लक्षात घेऊन बीड जिल्ह्याला विशेष प्राधान्य श्रेणीत समाविष्ट करण्यासाठी सध्या या मंत्रालयाकडे कोणतीही स्वतंत्र योजना उपलब्ध नसल्याचेही सरकारने स्पष्ट केले.दरम्यान, बीड जिल्ह्यात हरित क्षेत्र वाढविणे, पर्यावरणीय समतोल राखणे आणि जलसंवर्धनाच्या दृष्टीने भविष्यात राज्य शासनाने प्रस्ताव सादर केल्यास केंद्र सरकारच्या विविध योजनांच्या माध्यमातून त्याचा विचार केला जाऊ शकतो, असेही संकेत या उत्तरातून मिळाले आहेत.-महाराष्ट्रातील बीड जिल्हा हा दुष्काळग्रस्त जिल्हा असून येथे भूजल पातळी घटणे, कमी हरित आच्छादन आणि हवामान बदलाचे प्रतिकूल परिणाम गंभीर स्वरूपात दिसून येत आहेत, याची सरकारला माहिती आहे का?.-नगर वन योजना अंतर्गत बीड जिल्ह्यात आतापर्यंत किती शहरी वनांना मंजुरी देण्यात आली आहे, विकसित करण्यात आले आहे किंवा प्रस्तावित आहेत?.-अशा मंजूर किंवा प्रस्तावित शहरी वनांचे ठिकाणनिहाय तपशील, त्यांची सध्याची प्रगती आणि पूर्ण होण्याची संभाव्य कालमर्यादा काय आहे?.-पर्यावरणीय समतोल, पर्जन्यमान वाढ आणि जलसंधारण लक्षात घेऊन बीड जिल्ह्याला विशेष प्राधान्य श्रेणीत समाविष्ट करण्याचा सरकारचा विचार आहे का?

---------------------------------

पोलिसांनी राहुल अनिल काळे, विकास अनिल काळे व अनिल रामा काळे या बापलेकांना वाशी तालुक्यातील खामकरवाडी येथून दि.12 डिसेंबर रोजी अटक केली होती.त्यांच्याकडून 4 लाख 29 हजार रुपयांचे सोन्या चांदीचे दगिने व रोख रक्कम जप्त करण्यात आली होती. तसेच गुन्ह्यात वापरलेली गाडी देखील जप्त करण्यात आली आहे. यातील टोळी प्रमुखाने संघटीत गुन्हेगारांची टोळी तयार करून संघटीतरित्या बीड जिल्ह्यात पाच गंभीर गुन्हे केल्याचे निष्पन्न झाले आहे. हे गुन्हे शस्त्राचा धाक दाखवून आर्थिक फायद्यासाठी गेल्याचे समोर आले असून त्यानुसार पोलिस अधिक्षक नवनित कावत यांनी गेवराई पोलिस स्टेशन येथे दाखल गुन्ह्यात मिनी मकोका लावण्याची पवानगी पोलिस निरीक्षकांना दिली आहे.सदरची कामगिरी पोलिस अधिक्षक नवनित कावत, अपर पोलिस अधिक्षक सचिन पांडकर, उपविभागीय पोलिस अधिकारी अनिल कटके, पोलिस निरीक्षक शिवाजी बंटेवाड, यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक किशोर पवार, सपोनि अण्णासाहेब पवार, कल्याण राठोड, कांबळे यांच्यासह स्थानिक गुन्हे शाखेचे अभिमन्यु औताडे, विभीषण चव्हाण, शेख अलिम यांनी केली.

-----------------------------------

म्हणजे ॲक्युप्रेशर थेरपी आणि योगचिकित्सा याविषयी मुलींना सविस्तर मार्गदर्शन केले.त्या म्हणाल्या की सांस्कृतिक वारसा पुढे नेण्याचं कार्य महिला करत असतात. गुरुजन सर्वांना सारखंच ज्ञान देत असतात पण पुढे तोच समजतो ज्याची समजण्याची क्षमता जास्त आहे. मोबाईलमुळे एकाग्रता भंग पावत चाललेली आहे.

सुंदर दिसणे म्हणजे सुसंस्कारित असणे नव्हे.

मानसिक व शारीरिक या दोन्हीच्या सौंदर्य वाढीसाठी प्रयत्न केले पाहिजेत.

पाच ज्ञानेंद्रिय पाच कर्मेंद्रिय ईश्वराने दिलेले आहेत त्यांचा सदुपयोग म्हणजे परोपकारासाठी त्यांचा उपयोग केला पाहिजे . पण जेव्हा अन्याय होतो तेव्हा आपली ज्ञानेंद्रिये व कर्मेंद्रिये तलवारीप्रमाणे असली पाहिजेत असाही त्यांनी सल्ला दिला.

मुलींना अनेक समस्यांनी ग्रासलेले आहे. त्यात मर्मदाब चिकित्सा म्हणजे ॲक्युप्रेशर चिकित्सा अत्यंत उपयोगाची असल्याचे प्रतिपादन त्यांनी केले त्यात त्यांनी प्रात्यक्षिकाच्या माध्यमाने ॲक्युप्रेशरचे महत्व समजावून सांगितले.

यानंतर महिला पतंजली योग समिती परळीच्या अध्यक्षा सौ. सरलाताई उपाध्याय यांनी सविस्तर मार्गदर्शन केले.त्यांनी रेकी या विषयावर माहितीपूर्ण व्याख्यान दिले. रे म्हणजे ब्रम्हांड आणि की म्हणजे ऊर्जा असा रेकीचा अर्थ उलगडून दाखवला. योग अध्यात्म आणि रेकी या सर्व गोष्टी जीवनासाठी बहुमोल असल्याचे प्रतिपादन त्यांनी केले. दवाखाना बाहेर नाही आत आहे अशी जाणीवही त्यांनी करून दिली.

त्यानंतर आपल्या अध्यक्षीय समारोपात डॉ. आर.आर.पाध्ये यांनी आहार विज्ञानाविषयी विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले.सकस आहार ,शांत झोप आणि भारतीय संस्कृतीचा अवलंब या त्रिसूत्रीने महिलांना आपले आरोग्य अबाधित ठेवता येईल असा मोलाचा संदेश त्यांनी दिला.

या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील प्राध्यापक प्राध्यापिका शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

-----------------------------

सुभाष मारोती गित्ते आणि ॲड. शुभांगी सुभाष गित्ते यांनी केले.

---------------------------------------

मोहम्मद हानिफ यांची नातवंडे असून त्यांनी पहाटे सहरी करून दिवसभरातील पाच नमाज अदाकरत, संयमाने रोजा पाळला. संध्याकाळी इफ्तारच्या वेळी कुटुंबीयांच्या उपस्थितीत त्यांनी आपला पहिला रोजा पूर्ण केला. या प्रसंगी मुलांच्या आजी,आजोबांसह इतर सर्व कुटुंबीयांनी मुलांचे अभिनंदन करून त्यांना शुभेच्छा व आशीर्वाद दिले.रमजान महिन्यात रोजा पाळणे हे संयम, शिस्त आणि धार्मिक मूल्ये शिकवणारे असल्याने एवढ्या लहान वयात या चिमुकल्यांनी दाखवलेला उत्साह कौतुकास्पद असल्याची भावना व्यक्त होत आहे. त्यांच्या या प्रयत्नाबद्दल कुटुंबीय, नातेवाईक, मित्र-मैत्रिणी आणि परिचितांकडून सर्व स्तरांतून चिमुकल्यांचे अभिनंदन व कौतुक केले जात आहे. परळी वैजनाथ येथील खुदबे नगरमधील पाच चिमुकल्या भावंडांनी पवित्र रमजान महिन्याचा आपल्या आयुष्यातील पहिला रोजा पूर्ण केला.

----------------------------------

बाबासाहेव आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथून मॅरेथॉनला सुरुवात झाली. नगर रोड मार्गे पुन्हा सामाजिक न्याय भवन असा सुमारे 7कि.मी. चा मार्ग स्पर्धकांनी उत्साहाने पार केला.10 ते 18 वर्षे आणि 18 वर्षांवरील अशा दोन गटांत ही स्पर्धा पार पडली. दोन्ही गटांत चुरशीची स्पर्धा पाहायला मिळाली. स्पर्धेच्या शेवटी विजेत्या महिलांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. यामध्ये गट-अ (10 ते 18 वर्षे) या गटात कु. दिव्या राठोड हिने 29 मिनिटांत शर्यत पूर्ण करत प्रथम क्रमांक पटकावला. तिला 15,000 रुपये रोख पारितोषिक, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. द्वितीय क्रमांक कु. अमृता वायकर तर तृतीय क्रमांक कु. अक्षरा शेलार यांनी मिळवला. त्यांना अनुक्रमे 10,000 व 7,000 रुपये रोख पारितोषिकांसह सन्मानित करण्यात आले.गट-ब (18 वर्षांवरील) या गटात परिमला बाबर हिने 32 मिनिटांत शर्यत पूर्ण करत प्रथम क्रमांक मिळवला. तिला 15,000 रुपये रोख पारितोषिक, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. द्वितीय क्रमांक ज्ञानेश्वरी गुजर, तर तृतीय क्रमांक कांचन शिंदे यांनी मिळवला. त्यांनाही अनुक्रमे 10,000 व 7,000 रुपये रोख पारितोषिक, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. याशिवाय सर्व सहभागी स्पर्धकांना सहभाग प्रमाणपत्र देण्यात आले.या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी जिल्हा प्रशासन, योगा ग्रुप, बालाघाट ग्रुप, तसेच तुलसी शैक्षणिक समूहातील विविध युनिटचे प्राचार्य डॉ. विजयकुमार बांदल, प्रा. डी.डी. राऊत, प्रा.डी.जी निकाळजे, डॉ. सुनील जोंधळे, प्रा. प्रकाश ढोकणे, उमा जगतकर, डॉ. अश्विनी बेद्रे यांच्यासह शिक्षकवृंद व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. मॅरेथॉनला शहरातील नागरिक, पालक आणि विविध क्षेत्रातील मान्यवरांचीही मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती..

-------------------------

किशोरवयीन मुली व महिलांना याची माहिती असणे काळाची गरज आहे त्याचबरोबर त्यांनी HPV लसी बद्दल देखील सविस्तर माहिती सांगितली ते घेतल्यामुळे काय फायदा होतो त्यावर प्रकाश टाकला. अध्यक्षीय समारोपात डॉ. मंचक मोरे यांनी महिला दिनाच्या शुभेच्छा देऊन स्त्रियांनी आपलं आरोग्य व्यवस्थित सांभाळलं पाहिजे असे प्रतिपादन केले. याप्रसंगी रोटरी क्लबचे सदस्य डॉ. कल्पना मुळावकर,श्री. संतोष मोहिते, गृहशास्त्र विभाग प्रमुख डॉ. स्वाती अर्धापूरकर हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक रोटरी क्लबच्या अध्यक्षा प्रा. रोहिणी पाठक यांनी केले तर सूत्रसंचालन डॉ. अमृता मिसाळ यांनी केले व आभार प्रा. महेजबीन फारुकी यांनी मानले. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी प्रा. प्रणिता पोखरीकर यांनी देखील परिश्रम घेतले.या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक,शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थिनी बहुसंख्य उपस्थित होते.

----------------------------

प्रगतीची शक्ती असते त्यामुळे स्त्रीच्या सन्मानासोबतच आरोग्याची काळजी पण घेणे ही काळाची गरज आहे आणि आज ते कार्य महिला दिनानिमित्त परळी मेडिकल असोसिएशनचे अध्यक्ष डॉक्टर शालिनी कराड व त्यांच्या तज्ञ डॉक्टरांनी केले आहे त्यामुळे मी त्यांना धन्यवाद देते व अशीच आरोग्य शिबिरे वेळोवेळी राबविण्यात यावे असेही त्या म्हणाल्या तर मंचावरील मान्यवर यांनीही आपले विचार व्यक्त केले

यावेळी शिबिरातील उपस्थित रुग्णांची रक्त तपासणी व विविध आजारावरील सर्व रुग्णांची तपासणी प्रसिद्ध फिजिशियन व कराड हॉस्पिटल चे संचालक बालासाहेब कराड यांनी केली.

या वेळी शिबिरात तब्बल 256 रुग्णांचे मोफत थायरॉईड हार्मोन्स तपासणी मार्गदर्शन व उपचार पार पडले.

तसेच हे शिबिर यशस्वी करण्यासाठी कराड हॉस्पिटल चे संचालक व आमचे मार्गदर्शक बालासाहेब कराड व परळी मेडिकल असोसिएशनचे सचिव डॉक्टर मनोज मुंडे,डॉ सुनीता झंवर तसेच डॉ गंगाराम डोंगरे , बीड जिल्हा स्त्रीरोग संघटनेचे सर्व स्त्री रोग तज्ञ, आणि कराड हॉस्पिटल चा पूर्ण स्टाफ यांचे अमूल्य सहकार्य मिळाले. शेवटी आभार प्रदर्शन परळी मेडिकल असोसिएशनचे सचिव डॉ. मनोज मुंडे यांनी मानले

-------------------------

या प्रेरणादायी गीताने झाली. रेखा होके यांच्या मार्गदर्शनाखाली सिंदफणा पब्लिक स्कूलच्या विद्यार्थिनींनी उत्कृष्ट नृत्य सादरीकरण केले. तसेच सखाराम जोशी आणि प्रवीण मडके यांच्या दिग्दर्शनाखाली सामाजिक आशयाचे पथनाट्य "लढा महिला राजसत्तेचा" शाळेच्या शिक्षिकांनी सादर केली. माजलगाव विकास प्रतिष्ठानच्या सचिव नीला देशमुख यांनी प्रास्ताविकातून संस्थेच्या कार्याचा आढावा मांडला. ॲड. पल्लवी सोळंके यांनी शक्ती कायदा याबाबत महिलांना सविस्तर माहिती दिली. आपल्या भाषणात भीम रासकर यांनी महिलांना प्रेरणा देताना "आम्ही सख्या नाही पण पक्क्या बहिणी, सांदी कोपऱ्यात राहायचं नाय, राज्य करायला घाबरायच नाय, अशा घोषणांनी महिलांमध्ये आत्मविश्वास निर्माण केला. महिला राजसत्तेसाठी आपण सर्वतोपरी मदत करू असे त्यांनी जाहीर केले. अनेक महिला सरपंचांच्या चातुर्याचे अनुभव सांगत महिलांनी व्यापक राजकारणावरही बोलले पाहिजे, असे त्यांनी सांगितले. प्रत्येक महिलेनं किमान एक सत्ता केंद्र काबीज करण्याचा प्रयत्न करावा, ग्रामपंचायतीचे काम प्रत्यक्ष पाहावे आणि विरोधकांशी संवाद साधायला शिकावे, असेही त्यांनी नमूद केले. महिलांच्या चारित्र्यावर अनेकदा हल्ले केले जातात, मात्र अशा वेळी खंबीरपणे उभे राहणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले. समाजातील स्वावलंबी महिलांचा सत्कार व्हावा आणि महिलांनी जे जमत नाही तेही करून दाखवावे, असे आवाहन त्यांनी केले. "महिलांचा खरा दागिना म्हणजे ताठ मान आणि ताठ कणा" असे प्रभावी प्रतिपादनही त्यांनी केले. कृषी विज्ञान केंद्र, सगरोळीच्या संचालिका डॉ. माधुरी रेवणवार यांनी आपल्या भाषणात ज्ञान आणि विज्ञान यांच्या साहाय्याने सेंद्रिय शेती करणे ही काळाची गरज असल्याचे सांगितले. शेतीतील उत्कृष्ट कार्याबद्दल ज्ञानगंगा शेतकरी बचत गट तसेच हिरकणी महिला शेतकरी गटाचा सत्कार करण्यात आला. प्रीती कदम यांचा सेंद्रिय शेती करत असल्यामुळे सत्कार करण्यात आला. यावेळी माजलगाव विकास प्रतिष्ठानच्या 'दिशा परिवर्तनाच्या ' या वार्षिक अंकाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. माजलगावच्या नगराध्यक्षा शिफा चाऊस यांनी मनोगत व्यक्त करताना "मी नगराध्यक्षा असले तरी त्यापूर्वी आई, बहीण आणि सून आहे. त्यामुळे तुमचे दुःख हे माझे दुःख आहे," असे भावनिक मत व्यक्त केले.

या कार्यक्रमासाठी ॲड. पल्लवी सोळंके, मस्साजोगच्या सरपंच वर्षा सोनवणे, समाजसेवक धनंजय देशमुख, कवी प्रभाकर साळेगावकर, डॉ. जनक चौरे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सिंदफणा पब्लिक स्कूलच्या शिक्षिका शालिनी गडाख आणि अनुराधा सोळंके यांनी केले, तर आभार प्रदर्शन डॉ. वरुण तौर यांनी मानले. कार्यक्रमाच्या अध्यक्षीय समारोपात मंगलाताई सोळंके यांनी माजलगाव विकास प्रतिष्ठान असेच सामाजिक उपक्रम घेत राहील अशी ग्वाही दिली. कार्यक्रमाची सांगता संघटनेची ढाल गीताने झाली. माजलगाव विकास प्रतिष्ठानच्या संघटिका उर्मिला चोपडे, शोभा डाके,प्रभा गंगणे आणि राधा शिंदे यांनी कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी मेहनत घेतली.

----------------------------------------

सामाजिक बहुजन समाज पार्टी बीड जिल्हा प्रभारी अ□ड.अमोल डोंगरे यांनी केला आहे. अनेक गावांमध्ये प्रत्यक्षात कामे न करता कागदोपत्री कामे पूर्ण दाखवून कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च झाल्याचे दाखवले जात असल्याचा आरोप त्यांनी केला.या कथित गैरव्यवहाराच्या निषेधार्थ डोंगरे यांनी माजलगाव येथील ग्रामीण पाणीपुरवठा योजना उपविभाग कार्यालयासमोर अर्धनग्न अवस्थेत हलगी वाजवत आंदोलन केले. "बोगस कामांची चौकशी करा, संबंधित अधिकारी व ठेकेदारांवर कारवाई करा" अशी जोरदार मागणी यावेळी करण्यात आली. तसेच या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशाराही आंदोलनकर्त्यांनी दिला.आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर पंचायत समिती परिसरात नागरिकांची मोठी गर्दी झाली होती. काही काळासाठी परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. यावेळी प्रशासनाकडून आंदोलनकर्त्यांचे निवेदन स्वीकारण्यात आले असून प्रकरणाची चौकशी करण्याचे आश्वासन देण्यात आले असल्याची माहिती आंदोलनकर्त्यांनी दिली.

दरम्यान, राष्ट्रीय जलजीवन मिशन अंतर्गत होत असलेल्या कामांबाबत नागरिकांमध्येही नाराजी व्यक्त केली जात असून या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी तालुक्यातील विविध गावांमधून होत आहे. प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देऊन वस्तुस्थिती स्पष्ट करावी, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे. यावेळी आंदोलनात रमेश साळवे,हेमंत गोरे,संदिपान जाधव,ग्यानबा मस्के,सिरसट उपस्थित होते.

------------------------------------

सतत परतफेडीसाठी नोटीस दिली जाते परतफेड करण्यासाठी महामंडळाकडून तगादा लावला जातो व पुढे कोणताही लाभ घेण्यासाठी मनाई केली जाते त्यामुळे दलित व भटका समाज अत्यंत अडचणीत सापडला आहे .मात्र सरकारने या गोरगरीब समाजाचा कोणत्याही विचार केलेला नाही ज्याप्रमाणे सरकार शेतकऱ्याचा विचार करून त्यांना सहकार्य करते त्याचप्रमाणे या दलित व भटक्या समाजाचा विचार करून सर्व महामंडळाचे थकीत कर्ज माफ करून त्यांना पुढे कर्ज देऊन त्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी पावले उचललावेत नसता मानवी हक्क अभियान च्या वतीने सरकारला जाब विचारला जाईल असा इशारा बीड जिल्हा सचिव परमेश्वर आडागळे यांनी दिला आहे.

------------------------------------

देऊन सन्मानित करण्यात आले.

संघर्ष,जिद्द आणि प्रामाणिकपणाच्या बळावर यशस्वी वाटचाल करणारे युवा उद्योजक म्हणजे महेश तपसे यांची ओळख आहे.कोरोना काळात वडील कै.शिवदास कुंडलिकराव तपसे आणि बहीण कै.मिराताई शिनगारे यांचे दुःखद निधन हा त्यांच्या आयुष्यातील अत्यंत कठीण प्रसंग होता.मात्र संकटापुढे न हरता वडिलांच्या संस्काराची शिदोरी घेऊन त्यांनी चंदन सावरगाव येथे 'महेश पेट्रोलियम' ची यशस्वी स्थापना केली.

गेल्या चार वर्षात 24 तास अखंड सेवा देत, 100% गुणवत्ता व मोजमापाची खात्री राखत त्यांनी ग्राहकांचा अढळ विश्वास संपादन केला आहे.महेश तपसे यांनी शेतकऱ्यांसाठी डिझेल थेट बांधावर पोहोचण्याची सुविधा देत त्यांनी सेवेला नवे रूप दिले आहे.स्थानिक युवकांना रोजगार उपलब्ध करून देत सामाजिक बांधिलकीही जपली आहे.बहिणीच्या स्मरणाथ स्थापन केलेल्या "मिराई प्रतिष्ठानच्या" माध्यमातून गरजू विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती व विविध शैक्षणिक उपक्रम राबवून महेश तपसे समाजघडणीचे कार्य करत आहेत.

अशा जिद्दी संवेदनशील आणि समाजाभिमुख युवा उद्योजकास "उत्कृष्ट युवा उद्योजक" पुरस्काराने महेश तपसे यांना सन्मानित करण्यात आले. महेश शिवदास तपसे यांना पुरस्कार मिळाल्याबद्दल सर्वत्र त्यांचे अभिनंदन होत आहे.

---------------------------------

हॅलो बीड
परळी संघर्षनेता
मंगळवार दि. 10 मार्च 2026


# बीडमधील नागरी वनासाठी राज्य सरकारकडूनच नाही प्रस्ताव

## खा.बजरंग सोनवणे यांनी लोकसभेत उपस्थित केलेल्या प्रश्नावर मंत्री कीर्तीवर्धन सिंह यांचे उत्तर




केजः बीडकडे दुष्काळग्रस्त जिल्हा म्हणून पाहिले जाते, येथील दुष्काळीस्थिती बदलण्यासाठी उपाययोजना आवश्यक असून खा.बजरंग सोनवणे यांनी बीड जिल्ह्यातील भूजल पातळी घटणे, कमी होत चाललेले हरित क्षेत्र आणि हवामान बदलाचे वाढते परिणाम या गंभीर विषयाबाबत अनेक प्रश्न उपस्थित करून केंद्र सरकारचे लक्ष वेधले होते. दरम्यान, त्यांनी विचारलेल्या प्रश्नांबाबत केंद्र सरकारने उत्तर दिले असून यात नागरी वनांसाठी राज्य सरकारनेच प्रस्तावच दिलेला नाही, असा खुलासा केला आहे. यामुळे राज्यसरकारचा कारभार चव्हाट्यावर आलेला आहे.

बीडचे खा.बजरंग मनोहर सोनवणे यांनी लोकसभेत उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालयाचे राज्यमंत्री कीर्तीवर्धन सिंह यांनी म्हटले, देशातील अनेक जिल्ह्यांमध्ये पाण्याची टंचाई, मर्यादित हरित क्षेत्र आणि हवामानातील बदल यांसारखी पर्यावरणीय आव्हाने दिसून येतात. या समस्यांवर मात करण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकारांकडून विविध वृक्षारोपण तसेच पर्यावरणीय पुनर्स्थापना कार्यक्रम राबविण्यात येत आहेत. या उपक्रमांमुळे हरित क्षेत्र वाढण्यास मदत होत असून पर्यावरणीय आव्हानांचे परिणाम कमी करण्यास हातभार लागत आहे. मंत्रालयाकडून 'नगर वन योजना' राबविण्यात येत असून शहरांमध्ये नागरी वनांची निर्मिती व विकास करण्यासाठी ही योजना लागू आहे. राज्यांचे वन विभाग, महानगरपालिका, नगरपालिका तसेच इतर शहरी स्थानिक स्वराज्य संस्था यांच्या माध्यमातून या योजनेची अंमलबजावणी केली जाते. या योजनेसाठी राष्ट्रीय प्रतिपूरक वनीकरण निधीमधून आर्थिक सहाय्य दिले पान 3 वर

# महामार्गावर लूटमार करणाऱ्या टोळीवर मिनी मकोका

## गेवराईजवळ परराज्यातील प्रवाशांना मारहाण करत साडेतीन लाखांचे दागिने केले होते लंपास




बीड, : गेवराई शहराजवळील शिवशारदा शाळेजवळ थांबलेल्या गाडीतील प्रवाशांना मारहाण करत धाक दाखवून 3 लाख 46 हजार रुपयांचे दागिने चोरल्याची घटना घडली होती. दि.4 डिसेंबर 2025 रोजी घडलेल्या या घटनेतील आरोपी विरोधात आता पोलिस अधिक्षक नवनीत कावत यांनी मिनी मकोका अंतर्गत कारवाई केली आहे.सोलापूर-धुळे महामार्गावर नोव्हेंबर-डिसेंबर महिन्यात प्रवाशांना लूटण्याच्या घटना घडल्या होत्या. यामध्ये दि. 4 डिसेंबर रोजी खासगी गाडीने शिर्डी येथे जात असलेल्या शिवप्रसाद पौने (रा. तेलंगणा) हे सोलापूर-धुळे महामार्गावर गेवराईपासून काही अंतरावर असलेल्या शिवशारदा शाळेजवळ काहीवेळ थांबले होते.

यावेळी तेथे आलेल्या अज्ञात चोरट्यांनी अचानकपणे हल्ला करत लोखंडी रॉडचा धाक दाखवून प्रवाशांकडील 3 लाख 46 हजार रुपयांचा ऐवज चोरुन नेला होता. पान 3 वर या

# सांस्कृतिक वारसा पुढे नेण्याचं कार्य महिला करतात-डॉ.सौ. अंजली अयाचित यांचे प्रतिपादन




परळी वार्ताहर येथील लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने जागतिक महिला दिनानिमित्त महिलांच्या आरोग्याविषयी मार्गदर्शन सत्राचे आयोजन करण्यात आले होते.या कार्यक्रमात मार्गदर्शन करण्यासाठी छत्रपती संभाजीनगर येथून महिला पतंजली योग समितीच्या अध्यक्षा डॉ. सौ. अंजली अयाचित यांनी मार्गदर्शन केले. त्यासोबतच महिला पतंजली समिती परळीच्या अध्यक्षा सौ. सरलाताई उपाध्याय यांची विशेष उपस्थिती लाभली. कार्यक्रमाच्या अध्यक्षा म्हणून गृहविज्ञान विभागप्रमुख प्रा.डॉ. आर. आर. पाध्ये या उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.डॉ. अरुण चव्हाण यांनी केले.सूत्रसंचालन वनस्पतीशास्त्र विभाग प्रमुख प्रा.डॉ. एस.व्ही. कचरे यांनी केले तर आभार पा.डॉ. वीणा भांगे यांनी मानले.

या कार्यक्रमाच्या प्रमुख व्याख्यानात डॉ. अंजली अयाचित यांनी विद्यार्थिनींच्या आरोग्यासाठी अनमोल अशा प्रकारचे मार्गदर्शन केले. त्यात त्यांनी विशेषत्वाने मर्जदाब चिकित्सा पान 3 वर

# संत आणि ग्रंथ हीच वारकरी संप्रदायाची खरी संपदा आणि अस्मिता आहे.-ह. भ. प.ॲड.दत्तात्रय महाराज



परळी वैजनाथ (प्रतिनिधी )संत आणि ग्रंथ हीच वारकरी संप्रदायाची खरी संपदा आणि अस्मिता आहे असे प्रतिपादन संत वाङ्मयाचे संशोधक ह. भ. प.ॲड. दत्तात्रय महाराज आंधळे यांनी केले.

परळी वैजनाथ तालुक्यातील अत्यंत पवित्र असलेले व संत जगमित्र नागा यांच्या पावन पदस्पर्शाने पूनीत झालेले नंदागौळ या गावी, नाथ षष्ठी उत्सवसोहळ्या निमित्त कीर्तन आयोजित केले होते.

वारकरी संप्रदायामध्ये विपुल ग्रंथ निर्मिती करून संतानी आपणाला ग्रंथसंपदा दिली. संत ज्ञानेश्वर महाराजांनी अमृत अनुभव, चांगदेव पासष्टी, तसेच अभंग गाथा दिली. संत नामदेव महाराज, संत चोखामेळा, संत जगमित्र नागा, गोरोबा काका, संत मुक्ताबाई, संत जनाबाई यांचेही योगदान आहे नंतरच्या कालखंडात संत तुकाराम महाराज आणि संत एकनाथ महाराजांनी वाङ्मयनिर्मिती करून अलौकिक कार्य केलेले आहे.यावेळी कीर्तनाला साथ संगत ह. भ. प. प्रकाश महाराज जगताप,जी. टी. टेलर तर मृदंगाची साथ ह भ प बैरागी महाराज यांनी दिली.

प्रतिवार्षिक नाथषष्ठी उत्सव सोहळ्याचे आयोजन ॲड. सुभाष मारोती गित्ते हे करतात. यावर्षी ही मोठ्याप्रमाणावर या उत्सवाचे अत्यंत श्रध्देने आयोजनॲड. पान 3 वर

# परळीतील पाच चिमुकल्या भावंडांनी पूर्ण केला पहिला रोजा



परळी वैजनाथ (प्रतिनिधी) :

पवित्र रमजान महिन्याच्या निमित्ताने परळी वैजनाथ (जि. बीड) येथील खुदबे नगर परिसरातील पाच चिमुकल्या भावंडांनी आपल्या आयुष्यातील पहिला रोजा पूर्ण करून सर्वांचे लक्ष वेधले आहे. कु. जोया साबेर पठाण, कु. माहिरा सद्दाम पठाण, कु. लयबा सद्दाम पठाण, कु. सुलैम अय्यूब पठाण आणि चि. अरीब अय्यूब पठाण या चिमुकल्यांनी उत्साहाने आणि श्रद्धेने आपला पहिला रोजा पूर्ण केला.

ही सर्व मुले पठाण ताजखान पान 3 वर

# बीडमध्ये महिला मॅरेथॉन उत्साहात

## » जागतिक महिला दिनानिमित्त तुलसी शैक्षणिक समूहाचा उपक्रम; विजेत्यांना बक्षीस वितरण



बीड, जागतिक महिला दिनानिमित्त तुलसी शैक्षणिक समूह, बीड यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेली 'महिला मॅरेथॉन' स्पर्धा रविवार दि.8 रोजी उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. या स्पर्धेत शालेय विद्यार्थिनींपासून ते ज्येष्ठ महिलांपर्यंत सर्व वयोगटातील शेकडो महिलांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून आरोग्यजागृती आणि महिला सक्षमीकरणाचा संदेश दिलामहिला दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या महिला मॅरेथॉन स्पर्धेचे उद्घाटन बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जात पडताळणी विभागाचे सहाय्यक उपायुक्त उमेश सोनवणे तसेच तुलसी शैक्षणिक समूहाचे संचालक प्रा. प्रदीप रोडे यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून करण्यात आले.

यावेळी मार्गदर्शन करताना जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी महिला दिनानिमित्त मॅरेथॉनसारख्या उपक्रमाचे आयोजन केल्याबद्दल आयोजकांचे कौतुक केले. त्यांनी सांगितले की, विविध ठिकाणी आयोजित मॅरेथॉनमध्ये महिलांचा सहभाग तुलनेने कमी असतो, मात्र बीडमध्ये शंभर टक्के महिलांचा सहभाग दिसून येणे ही अभिमानाची बाब आहेतसेच त्यांनी बीड जिल्ह्यातील बालविवाह आणि मुलींच्या शिक्षणातील गळतीच्या प्रश्ना वरही प्रकाश टाकत समाजाने याबाबत जागरूक राहण्याचे आवाहन केले. अशा स्पर्धांमधून महिलांचा आत्मविश्वास वाढतो आणि समाजात सकारात्मक संदेश पोहोचतो, असे त्यांनी नमूद केले.सकाळी 6 वाजता डॉ. पान 3 वर




• बीड जिल्ह्याच्या प्राथमिक विभागाच्या कर्तव्यदक्ष शिक्षणाधिकारी डाॅक्टर किरण कुंवर मॅडम यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करताना संगीता शार्दुल मॅडम सो सुनिता जगताप मॅडम संजय जगताप सर रोहिदास शार्दुल सर व मराठवाडा शिक्षक संघाचे महानगर सचिव नवनाथ मंत्री छत्रपती संभाजीनगर

# महिला महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय महिला दिन उत्साहात साजरा




अंबाजोगाई प्रतिनिधी

रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटी आणि कला व वाणिज्य महिला महाविद्यालय अंबाजोगाई यांच्या संयुक्त विद्यमाने गृहशास्त्र विभाग व आजीवन शिक्षण व विस्तार सेवा विभागा मार्फत आंतरराष्ट्रीय महिला दिनाचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मंचक मोरे प्रमुख पाहुण्या म्हणून रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटीच्या अध्यक्षा प्रा. रोहिणी पाठक उपाध्यक्ष श्री.धनराज सोळंकी मुख्य वक्त्या डॉ. अर्चना थोरात ( स्त्रीरोग तज्ञ) उपस्थित होते. डॉ.अर्चना थोरात यांनी उपस्थितांना PCOD बद्दल सविस्तर माहिती सांगितली पान 3 वर

# स्त्री सन्माना सोबतच आरोग्य तपासणी शिबिरे महत्वाचे - पद्मश्री धर्म अधिकारी

## ➡ कराड हॉस्पिटल येथे मोफत थायरॉईड हार्मोन्स तपासणी, मार्गदर्शन व उपचार शिबिर संपन्न






परळी प्रतिनिधी...दि.8 मार्च 2026 रोजी जागतिक महिला दिनानिमित्त बीड जिल्हा स्त्रीरोग संघटना , परळी मेडिकल असोसिएशन, श्री बालाजी वैद्यकीय सामाजिक व शैक्षणिक संस्था संचलित कराड हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत थायरॉईड हार्मोन्स तपासणी व उपचार शिबिर आयोजित केले होते या कार्यक्रमाचे उद्घाटन परळी शहरच्या नगराध्यक्ष सौ पद्मश्री धर्माधिकारी यांनी केले. प्रमुख पाहुण्या म्हणून परळी न प च्या महिला बाल कल्याण सभापती सौ अंजली माळी, भाजपाच्या शहराध्यक्ष सौ उमाताई समशेटे तसेच नगरसेविका सौ अर्चना रोडे यांची उपस्थिती होती.

मोफत आरोग्य शिबिराची सुरुवात आरोग्याची देवता धन्वंतरी ,राष्ट्रमाता जिजाऊ तर मानवी श्रृंखलेतून मुक्त करून शिक्षणाचे दरवाजे खुले करणाऱ्या श्रीमती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमा पूजनाने करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रस्ताविक डॉक्टर शालिनी कराड यांनी केले तर कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी नगराध्यक्ष सौ पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी पुढे बोलताना म्हणाल्या स्त्री ही केवळ कुटुंबाची नव्हे तर संपूर्ण समाजाच्या पान 3 वर

**महिला दिनानिमित्त स्तुत्य उपक्रम**

# महिलांनी सेंद्रिय शेतीकडे वळणे ही काळाची गरज" : डॉ. माधुरी रेवणवार



माजलगाव (अनंत घडसिंगे ):

महिलांनी आधुनिक ज्ञान आणि विज्ञानाच्या आधारे शेती व सामाजिक कार्यात पुढे येणे आवश्यक आहे. सेंद्रिय शेतीसारख्या उपक्रमांद्वारे महिलांनी स्वावलंबी होत समाजाच्या प्रगतीत योगदान द्यावे. महिलांनी सेंद्रिय शेतीकडे वळणे ही काळाची गरज आहे असे प्रतिपादन कृषी विज्ञान केंद्र, सगरोळीच्या संचालिका डॉ. माधुरी रेवणवार यांनी केले. त्या माजलगाव विकास प्रतिष्ठानतर्फे आयोजित महिला मेळाव्यात बोलत होत्या.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मंगलाताई सोळंके या होत्या. कार्यक्रमाची सुरुवात "आम्ही घासून ठेवली ग्रामसभेची तलवार" पान 3 वर

# राष्ट्रीय जलजीवन मिशनमधील कथित बोगस कामांबाबत माजलगावात 'अर्धनग्न हलगी बजावो' आंदोलन




माजलगाव (प्रतिनिधी)* – बीड जिल्ह्यातील माजलगाव तालुक्यात राष्ट्रीय जलजीवन मिशन अंतर्गत सुरू असलेल्या पाणीपुरवठा योजनांमध्ये मोठ्या प्रमाणात अनियमितता होत असल्याचा आरोप करत बहुजन समाज पार्टी बीड जिल्हा प्रभारी अ□ड. अमोल डोंगरे यांच्या नेतृत्वाखाली पंचायत समिती कार्यालयासमोर 'अर्धनग्र हलगी बजावो' आंदोलन करण्यात आले. या आंदोलनामुळे परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

माजलगाव तालुक्यातील सुमारे 15 ते 30 गावांमध्ये राष्ट्रीय जलजीवन मिशनच्या माध्यमातून पाणीपुरवठा योजना राबवण्यात येत आहेत. मात्र या योजनांमध्ये मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाल्याचा आरोप पान 3 वर

# शेतकऱ्यांच्या कर्जमाफी प्रमाणे विविध महामंडळाचे कर्ज ही सरकारने माफ करावे --मानवी हक्क अभियान

माजलगाव (प्रतिनिधी) सरकारने नुकतीच शेतकऱ्यांसाठी कर्ज माफी केलेली आहे त्यामुळे सरकारचे मानवी हक्क अभियान च्या वतीने अभिनंदनच करण्यात येत आहे.मात्र अनेक वर्षापासून अडचणीत सापडलेला दलित व भटके विमुक्त समाजाला या अडचणीतून बाहेर काढण्यासाठी विविध महामंडळाचे थकीत कर्जही माफ करावे अशी मागणी मानवी हक्क अभियान चे बीड जिल्हा सचिव परमेश्वर आडागळे यांनी केली आहे.

महाराष्ट्रातील दलित व भटके विमुक्त समाज हा अतिशय हालाखीचे जीवन जगत आहे .हातावर पोट असणारा हा समाज आजही रोजगारासाठी भटकंती करीत आहे. या समाजाकडे शेती नाही ,उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही त्यामुळे या समाजाची उपासमार सुरु आहे. या समाजाने अनेक वर्षांपूर्वी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे महामंडळ ,महात्मा फुले महामंडळ ,संत रोहिदास महामंडळ इत्यादी महामंडळाकडून कुटुंबाचा उदरनिर्वाह करण्यासाठी थोडेफार कर्ज घेतले होते मात्र सततच्या दुष्काळामुळे व रोजगार उपलब्ध नसल्यामुळे महामंडळाचे कर्ज परत करणे जमले नाही मात्र त्या कर्जदाराला महामंडळाकडून पान 3 वर

# महेश तपसे 'उत्कृष्ट युवा उद्योजक' पुरस्काराने सन्मानित



बीड : प्रतिनिधी राष्ट्रीय पत्रकार संघ,मराठी पत्रकार परिषद मुबंई व पुरोगामी पत्रकार संघ यांच्या संयुक्त विद्यमाने केज तालुक्यातील चंदनसावरगाव येथील महेश शिवदास तपसे यांना 'उत्कृष्ट युवा उद्योजक' पुरस्कार पान 3 वर